काही माणसं स्वप्नांचा पाठलाग करतात, आपल्या कृतीतून जगण्याचे नियम बनवून यशस्वी होतात. त्यांची ही गोष्ट.

नवी गोष्ट शिकणं आणि तिचा सराव करणं ही साधना आहे.

साधनेत सातत्य हवे. सातत्याने सहजता येते. सहजतेतून पारंगतता मग जीवनाचे मुख्य मूल्य बनते.

आयुष्य हा एक प्रवास आहे. त्याचे अदृश्य परिपूर्ण तत्त्व समजून घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आनंदाचा साक्षात्कार.

बहुतांशी समुद्रपक्ष्यांचं जगणं साधं सरळ असतं. दोन वेळेसच्या खाण्यासाठी धडपडणं, पोटाची खळगी भरणं म्हणजे जगणं नाही. छोट्या-मोठ्या कारणांसाठी आपसात भांडत राहणं, जिवंतपणाचं लक्षण नाही.

जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल इतरांसारखा सामान्य समुद्रपक्षी नव्हता. त्याच्यासाठी उडणं आनंदासाठी होतं. निर्दोष परिपूर्ण उडणं म्हणजे स्वर्गाचा अनुभव. कामात पारंगतता आली की, मर्यादांच्या शृंखला गळून पडतात. याकरिता हवेत प्रचंड कष्ट, मेहनतीचा निरंतर ध्यास आणि आत्मबलाची साथ आणि हे सगळं घडतं फक्त कृतीच्या वर्तमान क्षणात; म्हणूनच प्रत्यक्ष वर्तमानाचा क्षणच महत्त्वाचा आहे. आवडीचं काम करणं हेच खरं स्वातंत्र्य आहे. यातून हाती येतं अंतिम सत्य.

अज्ञानाची भीती दूर सारून नव्या गोष्टी शिकत गेलो की, जगणं सुंदर बनत जातं.

ही आहे एक दंतकथा. आपल्या दररोजच्या जगण्यातच आपलं ईप्सित शोधण्याचा मार्ग दाखविणारी गोष्ट. समुद्रपक्ष्यांचा कळप, त्यांचं उडणं. थव्यांचे रीतिरिवाज आणि कायदेकानून, इथं रूपक म्हणून आले आहेत.

जर आपण आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा केला, तर त्या क्षेत्रातल्या अत्युच्च शिखरावर पोहोचता येतं, हे जोनाथनच्या गोष्टीचं सार आहे.

ISBN 978-81-7786-625-4
9 788177 866254
₹ 100/-
A.H.W. Saket Series

साकेत प्रकाशन

www.saketpublication.com

इंटरनॅशनल बेस्टसेलर पुस्तक

जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल

रिचर्ड बाक

अनुवाद

बाबा भांड

जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल

जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल

रिचर्ड बाक्

छायाचित्रकार : रशेल मुनसन

अनुवाद

बाबा भांड

साकेत प्रकाशन

जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल
कथा
रिचर्ड बाक्
अनु. बाबा भांड

■

प्रकाशन क्रमांक - १३७०
पहिली आवृत्ती - २०११

■

प्रकाशक
साकेत बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५,
फोन- (०२४०)२३३२६९२/९५.
www.saketpublication.com
info@saketpublication.com

■

पुणे कार्यालय
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
ऑफिस नं. ०२, 'ए' विंग, पहिला मजला,
धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, ३७३ शनिवार पेठ,
कन्या शाळेसमोर, कागद गल्ली,
पुणे -४११ ०३०
फोन- (०२०) २४४३६६९२

■

अक्षरजुळणी :
धारा प्रिंटर्स प्रा. लि., औरंगाबाद

■

मुद्रक :
प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा. लि.,
जी-१२, एम.आय.डी.सी.
चिकलठाणा, औरंगाबाद.

■

मुखपृष्ठ - धारा प्रिंटर्स प्रा. लि.

■

किंमत :१०० रुपये

ISBN-978-81-7786-625-4

आपले नाव ,पत्ता व इमेल ९८८१७४५६०५ वर SMS करून नवीन पुस्तकांची माहिती घरपोच मिळवा.

Jonathan Livingston Seagull

Story
Richard Bach
Original English Title
Jonathan Livingston Seagull
Translated into Marathi
by Baba Bhand

"Marathi Language Translation
copyright © 2011 by Saket Prakashan
Pvt.Ltd

JONATHAN LIVINGSTON SEAGULL

Copyright © 1970 by Richard Bach
Copyright renewed © 1998 by Richard
Bach
Photographs copyright © 1970 by
Russell Munson
Photographs copyright renewed © 1998
by Russell Munson

All Rights Reserved.

Published by arrangement with the
original publisher, Scribner, a Division
of Simon & Schuster, Inc."

वास्तवातील जोनाथन सीगलला
जो प्रत्येकात सुप्तावस्थेत असतोच...

आशा : एक

सकाळची आल्हाददायक वेळ.

शांत सागरावर उगवत्या सूर्याची कोवळी किरणं हळुवार लाटांसोबत नाचत होती. उसळणाऱ्या लाटा चकाकत होत्या.

किनाऱ्यापासून दूर मैलभर अंतरावर एक बोट दिसत होती. मासेमारीची ती बोट होती. उठणाऱ्या लाटांशी मैत्री करीत, दोन्ही अंगांवर संथपणे डुलत होती. न्याहारीची वेळ होत आली. सकाळच्या वायूलहरीसोबत ध्वनी ऐकू येऊ लागला. हजारो समुद्रपक्ष्यांचा थवा चालून आला. बोटीवर अन्नाचे काही तुकडे पडले होते. त्यावर सगळे तुटून पडले. खाण्यासाठी धडपडू लागले. भांडू लागले. आवाज करू लागले. शेजाऱ्यास पंखानं तडाखे देऊ लागले.

आणखी एक दिवस उजाडला. नेहमीच्या रहाटगाडग्याची सुरुवात झाली. सर्वत्र पक्ष्यांची धावपळ जाणवू लागली.

जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल उडण्याचा सराव करीत होता. एकटाच होता आणि त्या किनाऱ्यापासून दूर होता. पाण्यावर डुलणाऱ्या बोटीपासून अलग दिशेला होता. आता आकाशात शंभर फुटांवर तो उडत होता. पायांचे पंजे जाळीदार पातळ कातडीने जोडलेले होते. दोन्ही पाय शरीरापासून खाली सोडलेले. मान वरच्या बाजूला उचललेली. वळसा घेताना पंखांना

थोडा ताण पडला. ते दुःख सहन करत पंखाद्वारे हळुवार गिरकी घेतली. वळसा घेणं म्हणजे पंख न हलविता संथपणे तरंगत राहणं. आता तर तो इतका हळू तरंगत होता, की सकाळची मंद झुळूक त्याच्या कानाशी कुजबुजू लागली आणि खाली अथांग निळाभोर सागर जणू स्तब्ध झाला होता. त्याने नजर बारीक केली. दूरवरच्या लक्ष्याकडे दृष्टी केंद्रित केली. श्वास रोखला. पुन्हा एका झुळुकीसोबत गिरकी घेऊ लागला. एक एक इंच पुढे सरकू लागला. शेवटी पंखांची फडफड झाली. अद्यापपर्यंतची शांतता या आवाजानं भंगली. उडण्याचा वेग मंदावल्यानं नियंत्रण सुटल्यासारखं तो क्षणभर डळमळला आणि शेवटी खाली पडला.

आपणास माहीत आहे काय?

समुद्रपक्षी आकाशात उडताना अडखळत नाहीत आणि कधी डळमळतही नाहीत. हवेत डळमळणं त्यांच्यासाठी लाजिरवाणी गोष्ट मानली जाते. ती अप्रतिष्ठेची आहे.

अशा परिस्थितीत जोनाथन लिव्हिंगूस्टन सीगल लाजिरवाणं न समजता उडत होता. पंखांना पुन्हा पुन्हा ताण देत उडत होता. अवघड गिरकी घेताना डगमगत होता. या वेळी गती कमी करीत पुन्हा डळमळत होता, कारण तो काही सामान्य पक्षी नव्हता.

बहुतांश पक्षी उडण्याच्या नेहमीच्या पद्धतीपेक्षा अधिक काही शिकण्याकडे लक्षच देत नसत. समुद्र किनाऱ्यापासून अन्न मिळते, त्या ठिकाणापर्यंत जाणं आणि परत येणं एवढंच त्यांचं शिकणं असायचं. हे पक्षी उडण्यापेक्षा खायला काय मिळतं, हेच महत्त्वाचं मानत. मात्र या सगळ्यांपेक्षा जोनाथन लिव्हिंगस्टनला उडताना खूप आनंद होई.

इतरांपेक्षा आपण वेगळे आहोत, हे दाखविण्याचा मार्ग म्हणजे सतत उडत राहणं नव्हे, हे त्याच्या लक्षात आलं होतं.

जोनाथनची दिवसभरातली एकल्याची भरारी बघून, त्याच्या पालकांचीसुद्धा हिंमत खचली. समुद्रावर कमी उंचीच्या मंद हालचालीच्या त्याच्या प्रयोगाची त्यांना भीतीच वाटू लागली.

असं का व्हावं, त्यांला समजत नव्हतं.

जेव्हा तो आकाशात भरारी घेई आणि नेहमीच्या उंचीच्या अर्ध्यावर आला, की पंखांची जोडी सावकाश आरामात पसरून देई आणि कमी प्रयासाने सहज तरंगत राही. या मंद हलचालीचा शेवट झटकन पाय खाली सोडत पाण्यावर झडप घातल्यासारखा होत नसे, तर पोटाशी पाय घट्ट पकडून पाण्याशी कमी विरोध होईल अशा हलक्याशा स्पर्शाने होई. संथ पाण्यातून एखादी बोट जाऊ लागली, की मागे मिटत जाणाऱ्या रेषेसारखी खूण उमटे.

समुद्रकिनारी खाली उतरण्याच्या वेळी त्याच्याकडे बघून त्याच्या पालकांच्या पोटात भीतीचे पाय फुटत; पण तो उडण्याची गती अन् खालच्या अंतराचा अंदाज घेऊन अलगद वाळूवर उतरे.

"असं का पोरा?" त्याची आई काळजीने कुरकुरे. "अशी अवघड झेप का घेतोस? थव्यातील इतर पक्ष्यांसारखं का वागत नाहीस? बेटा, ते पेलिकन आणि इतर समुद्रपक्षी बघ! ते सगळे कमी जोखमीच्या उंचीवरून उडत असतात. ते जे उडत जाऊन अन्न मिळवितात, ते खाणं चालणार नाही का तुला? अरे, तू तरी काय आहेस, हाडं आणि पिसांचा सांगाडाच ना!"

"असू दे मी हाडं आणि पंखांचा नुसता सांगाडा आई! हवेत मला काय जमतं आणि काय जमत नाही, हे मला फक्त जाणून घ्यायचं आहे."

"जोनाथन, आम्ही काय सांगतो ते ध्यानात घे!" काळजीच्या स्वरात वडील म्हणाले, "हिवाळा आता दूर नाही. हळूहळू सागरावरच्या बोटी कमी होतील. पाण्यात वरच्या बाजूनं पोहणारे मासे खोल जातील. तुला जर अभ्यासच करायचा असला तर, पोटाच्या अन्नाचा कर! ते कसं मिळवायचं हे शोध. मोकळ्या आकाशात भरारी मारायचं काम चांगलं आहे, कल्पनांच्या भराऱ्यांसारखं; पण हवेत तरंगल्याने पोट भरत नाही. भूक भागत नाही. अन्नासाठी वेगळा प्रयत्न करणं गरजेचं आहे. हे ध्यानात ठेव की, तुझी प्रत्येक भरारी ही पोटासाठीच आहे."

जोनाथनने आज्ञाधारकपणे मान डोलावली. नंतरचे काही दिवस तो इतर समुद्रपक्ष्यांसारखा वागण्याचा प्रयत्न करू लागला. समुद्रकिनारी असलेल्या धक्क्यावर कर्कश आवाज काढत उडू लागला. आजूबाजूच्या थव्यांशी झगडू लागला. शिकारी बोटीवर सापडणाऱ्या पावाच्या अथवा माशांच्या तुकड्यासाठी मुसंडी मारू लागला; परंतु मनासारखं काम होत नव्हतं. या कामात मन रमत नव्हतं.

एके दिवशी एक वयस्कर भुकेला समुद्रपक्षी त्याच्या मागं उडत होता. हेरिंग प्रकारच्या माशाचा एक तुकडा त्याच्या तोंडात होता. तुकडा कठीण होता. भुकेल्या म्हाताऱ्या समुद्रपक्ष्यासाठी हेतूपुरस्सर तो तुकडा टाकून तो स्वतःशी म्हणाला, 'हे सगळं जगणं निरर्थक आहे. पोट भरण्यासाठी ही सगळी धडपड! त्यापेक्षा, मी सगळा वेळ कसं उडावं, हे शिकण्यासाठीच

खर्च करीन. आजूबाजूला शिकण्यासारखं खूप आहे. तेच मला करायचं आहे.'

आणखी काही काळ लोटला.

जोनाथन नेहमीसारखा दूर समुद्रावर उडत होता. भटकत होता. भूक लागली; पण उडण्याच्या आनंदाचा नवा अनुभव तो सगळा विसरला.

उडण्यात मूळ मुद्दा गतीचा होता आणि एका आठवड्याच्या सरावानंतर सर्वात वेगवान समुद्रपक्ष्यापेक्षा त्याला अधिक शिकायला मिळालं होतं.

एक हजार फूट उंचीवर तो आपले पंख फडफडवीत उडत होता. मधेच त्यानं लाटांच्या दिशेनं आवेगानं मुसंडी मारली. यावेळी तो स्वतःशी म्हणाला, 'इतर समुद्रपक्षी यासारखे जोरकस सूर का मारत नाहीत, हे आता मला उमजले.'

केवळ सात सेकंदात तो ताशी सत्तर मैल वेगानं उडू लागला. या गतीत पंख वर उचलताना बरेचदा अस्थिर व्हायला होई.

पुन्हा पुन्हा असं घडत गेलं.

आपल्या अत्युत्तम कार्यक्षमतेनं तो काळजीपूर्वक उडत होता; मात्र मध्येच वाढविलेल्या वेगानं त्याचं संतुलन बिघडलं.



पुन्हा एक हजार फुटांपर्यंत झेप घेणं आलं. पूर्ण शक्तिनिशी त्यानं पंखात बळ भरलं. हवेत उभा लंब काढल्यासारखी सरळ आकाशात झेप घेतली. यावेळी डावा पंख वर उचलताना प्रत्येक वेळी तो डळमळला. ढकलल्यागत डावीकडे हेलकावला. उजव्या पंखानं अडखळणं सावरलं. जंगलातील वणव्यानं अकस्मात हलका चटका बसल्यासारखा तो अनुभव स्वीकारून त्यानं उजवीकडे डौलदार गिरकी घेतली.

वरच्या बाजूला पंख उचलून फट्कार मारतानासुद्धा तो पुरेशी काळजी घेत नव्हता. लागोपाठ दहा वेळेस त्यानं प्रयत्न केला. ताशी सत्तर मैलांच्या गतीनं प्रवास सुरू होता; पण मध्येच एकाएकी संतुलन बिघडून तो पाण्यात कोसळला. जणू पंखांचा पांढरा शुभ्र लोण्याचा गोळाच पाण्यावर फुटला.

आता यावर काय उपाय?

त्यानं विचार केला अन् पुन्हा पन्नासच्या गतीने वरच्या दिशेनं झेप घेतली. पाण्यानं भिजलेले पंख पान्हा फुटल्यासारखे गळू लागले. अधिक गती साधताच स्थिर झाले. पुन्हा वरच्या दिशेनं मुसंडी घेऊन आणखी स्थिर झाले.

तो आता दोन हजार फुटांवर उडत होता. आजूबाजूला बघत सौम्य उताराचा कोन करून खाली सूर मारला. चोच खाली घेतलेली. पंख दोन्ही बाजूंना स्थिर ताणलेले. वेग ताशी पन्नास मैलांचा. पंखांना यावेळी प्रचंड ताण जाणवला; पण ते ठीक जमलं. दहा सेकंदानंतर पुन्हा ताशी नव्वद मैलांची गती पकडली.

जोनाथनने समुद्र पक्ष्यांच्या वेगानं उडण्याचा जागतिक विक्रमच केला होता; पण त्याचा हा विजय अल्पकाळीच ठरला. त्यानं उसळी घेत झेप घेतली. पंखांची एकाएकी दिशा बदलली. यावेळी प्रचंड अस्थिरतेच्या संकटानं त्याला घेरलं. नव्वद मैल वाऱ्याच्या वेगानं तो सुसाट सुटला अन् एखाद्या स्फोटासारखा हवेवर आदळून हेलपाटत भर समुद्रात कोसळला.

जेव्हा तो सावरला, त्यावेळी सर्वदूर अंधारानं जाळं पसरायला सुरुवात केली होती. चंद्राच्या मंद प्रकाशानं अंधार विरत गेला आणि तो पाण्यावर तरंगू लागला. त्याचे पंख जखम लोखंडाचे जड पाते भासू लागले. त्या ओझ्यानं तो थकून गेला. कोसळल्याच्या दुःखापेक्षा पाठीवर स्वार झालेल्या अपयशाचं ओझं अधिक होतं.

तो विचार करू लागला, 'माझ्या मनाचा कमजोरपणा आहे हा! मी त्यास शरण गेलो, तर तो समुद्रतळाशी खेचून नेल्याशिवाय राहणार नाही. असं झालं तर मग सगळा खेळ खलास!'

विचारात तो बुडाला तसा तरंगण्याचा क्षणभर विसरच पडला आणि तो थोडासा पाण्यात बुडाला. त्यासरशी एक विचित्र आवाज खोल पोकळीतून यावा तसा ऐकू येऊ लागला.

तुझ्यासमोर आता दुसरा मार्ग नाही.

मी एक समुद्रपक्षी आहे. माझ्या हाडामांसाच्या शरीराची अन् या पंखांची एक मर्यादा आहे. मला उडण्याचा ध्यास आहे. त्याबद्दल अधिक शिकायचं आहे, ही ऊर्मी आहे. तर याबद्दल मनात एक आणखी स्पष्ट

चित्र असलं पाहिजे. मला अधिक गतीनं उडायचं आहे. बहिरीससाणा उडतो तसं उडायचं. मग त्याच्यासारखे आखूड बळकट पंख हवेत आणि माशाऐवजी उंदरांवरही जगता आलं पाहिजे.

माझे वडील सांगत होते, ते पटायचं नाही त्यावेळी; पण आता वाटू लागलं, त्यांचं सांगणं बरोबर होतं. मी केलेला मूर्खपणा आता विसरला पाहिजे. मला घराकडे आपल्या कळपात गेलं पाहिजे. एक समुद्रपक्षी आहे त्या गोष्टीत समाधानी असतो. समाधानातही मर्यादा असते. तसं मला जगता आलं पाहिजे.

आतील आवाज विरत गेला.

जोनाथन म्हणाला, "मला हे सगळं मान्य आहे."

सगळ्या समुद्रपक्ष्यांसाठी रात्रीच्या वेळी समुद्रकिनारा हेच निवाऱ्याचं ठिकाण असतं. आता या क्षणापासून त्यानं स्वतःशी शपथ घेतली.

यापुढे मी एक साधारण समुद्रपक्षी म्हणूनच वावरेन. माझ्या वागण्याने सर्वजण आनंदी होतील.

काळ्याशार जलाशयास जणू तो कंटाळला होता. म्हणून तो त्यापासून दूर निघाला. दूरवरच्या समुद्रकिनाऱ्याच्या दिशेनं उडू लागला. कमी उंचीवरून उडताना कमी श्रम जाणवत होते. या उडण्याच्या कसब अन् अनुभवाबद्दल त्याला कृतज्ञता वाटू लागली.

उडण्यासोबत मनात विचार सुरू झाले.

मला जसं हवं होतं, तसं मी करत आलो. मी जसा शिकलो, तसंच मी केलं. मी एक समुद्रपक्षी आहे. इतर समुद्रपक्ष्यांसारखाच एक आहे आणि मी माझ्यासारखाच उडणार.

वेदना पचवून त्यानं पंख फडफडवले. शंभर फुटांपर्यंत झेप मारली. पंखांची जोरकस हालचाल करीत किनाऱ्याच्या दिशेनं झेपावला.

आताच्या निर्णयानं त्याला उभारी जाणवली. उत्साह वाटू लागला. आपलाही पक्ष्यांचा थवाच आहे. इथं कुठलीही बंधनं नाहीत. नवीन काही शिकलं पाहिजे अशी कोणतीही सक्ती नाही. वेगळं काही करायचं असं समोर आव्हान नाही आणि अपयशाची भीतीही नाही.

किती सुंदर आहे हे सगळं जगणं!

इथं विचारचक्र थांबवायचं. मागची उजळणी नाही. उद्याची चिंता नाही आणि वर्तमानाची भीती नाही. घनघोर अंधारातून समुद्रकिनारी खाली लुकलुकणाऱ्या प्रकाशांच्या काजव्यांच्या दिशेनं मनसोक्त उडत राहायचं.

अंधार!

आतला खोल आवाज चिरकला.

समुद्रपक्षी काळोखात कधीच उडत नसतात.

जोनाथनचं पुरेसं लक्ष नव्हतं.

खरंच, किती सुंदर आहे हे! त्यानं विचार केला.

आकाशातला चंद्र आणि किनाऱ्यावरचा प्रकाश पाण्यावर बागडत आहे. काळोखावर प्रकाशरेषांची जणू रांगोळी काढलेली. सगळं कसं शांत शांत आणि खोलवर निवांत आहे.

खाली उतर! समुद्रपक्षी कधी अंधारात उडत नसतो. जर तुला काळोखातच उडायचं असेल, तर तुला हवेत घुबडांचे डोळे, हवाय मनाचा उडण्याचा नकाशा आणि हवेत बहिरी ससाण्यासारखे मजबूत आखूड पंख.

त्या रात्री जोनाथन लिव्हिंगस्टन सीगलनं शंभर फूट उंचीवरून उडत असताना पापण्यांची उघडझाप केली. त्याची सर्व वेदना, निग्रह पार पळून गेले.

फक्त आखूड पंख!

बहिरी ससाण्याचे आखूड पंख!

हेच आहे या सर्वांवर एकच उत्तर. असा कसा मी मूर्ख बनलो! मला पाहिजेत फक्त हवेत छोटे-छोटे मजबूत पंख. ते मला सहज मिटता आले पाहिजेत आणि पंखांच्या कडांनी छान उडता आलं पाहिजे.

आखूड पंख!

काळोखाचं छत असलेल्या सागरावर त्यानं दोन हजार फुटांपर्यंत झेप घेतली होती. अपयश आणि मृत्यूचा क्षणभर लवलेशही शिल्लक नव्हता. त्याने पंखांची शरीराशी घट्ट घडी करून घेतली. पंखांचे सुऱ्यासारखे अणकुचीदार टोकंच फक्त वाऱ्यावर सोडले. हवेत उभा लंब काढल्यासारखी खाली झेप घेतली.

यावेळी डोक्यावर एखाद्या खवळलेल्या राक्षसासारखा वारा बेभानपणे घोंगावत होता. एका तासात सत्तर मैल, नव्वद मैल इतकंच काय शंभराहून अधिक गतीनं तो वाहत होता. पूर्वी केवळ सत्तर मैल वेगाला जाणवणारा पंखांचा ताण आता मात्र एकशे चाळीस मैलाएवढा जाणवू लागला. पंखांची टोकं कमजोर जाणवू लागली. ताण सहन करत त्यानं हळुवार गिरकी घेतली. आकाशातील तपकिरी चंद्राच्या गोलाकडं आरामात नजर टाकली. हळुवार डोळे मिटले. वाऱ्याच्या प्रतिरोधाला सहन करत जणू पलीकडच्या फटीतून पाहू लागला. ते बघून तो आनंदित झाला. तासाला एकशे चाळीस मैल!

आणि सर्व प्रकारच्या संतुलनासह!

त्याच्या मनात विचार आले.

आता दोन हजार फुटांवरून उडणं सुरू आहे. यापेक्षा जास्त, पाच हजार फुटांवरून झेप घेतली तर... किती अद्‌भुत वेगानं होईल ती?

काही क्षणापूर्वी त्यानं शपथ घेतली होती. तिचा त्याला नकळत विसर पडला. वाऱ्याच्या प्रचंड लाटेवर तो हंदकळू लागला. स्वतःला त्यानं वचन दिलं होतं. ते आज मोडलं जात होतं. तरीही त्याला वाटत होतं, आपण निरपराधीच आहोत. अशी वचनं ही फक्त समुद्रपक्ष्यांसाठीच असतात. जे सामान्य असतात, तेही त्यांचा स्वीकार करीत असतात. जेव्हा तुम्ही आपल्या क्षेत्रात अत्युच्च शिखर गाठता तेव्हा मग या नियमांची आणि बंधनांची काही गरज राहत नाही.

सूर्योदय झाला. जोनाथनने पुन्हा नेहमीचा सराव सुरू केला. पाच हजार फूट उंचीवरून मच्छीमारांची बोट निळ्या पाण्यावर एका ठिपक्यासारखी दिसू लागली. सकाळच्या न्याहारीसाठी समुद्रपक्षी जमले होते. धुळीच्या ढगात गोल गोल फिरणाऱ्या चंदेरी कणांसारखे ते पक्षी दिसू लागले.

ते दृश्य बघून तो आनंदानं थरथरू लागला.

त्याच्या मनात आंदोलन सुरू झालं.

माझ्यात चैतन्य आहे. भीतीला मी दूर पळवून लावलं, ही अभिमानाची बाब आहे.

कोणताही शिष्टाचार न बाळगता त्यानं त्याच्या पंखांना जणू घट्ट आलिंगन दिलं. ते हळुवार मिटून घेतले. मिटलेले आखूड पंख जागीच ताणून दिले. पंखांच्या टोकांना हलकिशी दिशा दिली आणि समुद्राच्या दिशेनं स्वतःला झोकून दिलं.

चार हजार फुटांपर्यंतचा प्रवास होता तो. प्रवास संपत येताच किनाऱ्यावर उतरण्याअगोदर गतीला आवर घालावी लागते. खाली उतरताना वाऱ्याच्या अभेद्य भिंतीशी सामना करताना पंखांचा वाऱ्यामुळे थपथप आवाज होत होता. जलदगतीनं उतरताही येत नव्हतं. तो आता सरळच खाली येऊ लागला. आता त्याचा वेग दोनशे चौदा मैल होता.

त्याच्या मनात विचार आला.

असेच पंख मिटलेले अन् वेगाने खाली येत गेलो तर? आदळून हजारो तुकडे होतील या समुद्रपक्ष्यांच्या हाडामांसाचे! लागलीच त्याने हा विचार दूर सारला.

आपली गती हीच अचाट अदृश्य शक्ती आहे. त्याच गतीत उडताना आनंदाचं झुंबर टांगलेलं असतं. त्या क्रियेतच कलात्मक सुंदरता आहे.

एक हजार फुटांवर त्यानं पंख आकसून घेण्यास सुरुवात केली. मुडपलेल्या पंखांची टोकं भन्नाट वाऱ्यावर धब्ब धब्ब आवाज करू लागली. दूरवरची बोट धूसर दिसू लागली. आकाशातील एखादी उल्का निखळून कोसळावी तसा तो वेगानं खाली येऊ लागला. दूरवर आकाशात उडणारा समुद्रपक्ष्यांचा थवाही समोर दिसू लागला.

तो अचानक थांबू शकत नव्हता. या गतीत मार्ग कसा बदलावा, हेही त्याला समजेना.

समोरच्या पक्ष्यांच्या थव्यावर आदळून टक्कर होणं म्हणजे साक्षात मृत्यूशी गाठ. काय करावं?

आणि त्याने चटकन डोळे मिटून घेतले.

नुकताच सूर्य क्षितिजावर डोकावत होता. सकाळच्या न्याहारीकरिता निघालेल्या समुद्रपक्ष्यांच्या थव्याच्या दिशेनं जोनाथन लिव्हिंगस्टन सीगलने सरळ झेप घेतली.

दोनशे मैलाची गती होती हे त्याच्या लक्षात आलं. डोळे गच्च मिटलेले. घोंगावणाऱ्या प्रचंड वाऱ्याचा किंकाळीसारखा आवाज येऊ लागला आणि त्या आवाजात पंखांची थडथड मिसळून गेली. समुद्रपक्ष्याचं दैव त्याच्याकडं बघून खुदकन हसलं आणि सुदैवानं कोणालाही इजा झाली नाही.

जोनाथनने सुटकेचा सुस्कारा सोडला. आपली चोच सरळ वर आकाशाकडे केली. तासाला एकशेसाठ मैलांच्या वेगानं जणू तो आगीतून होरपळून बाहेर निघत होता. संकटातून बाहेर आलोय, ही भावना होताच वीसेक मैलानं गती कमी केली आणि शेवटी आरामानं पंख ताणून दिले. चार हजार फूट खाली समुद्रावरची बोट एखाद्या पावाच्या तुकड्यासारखी दिसू लागली.

तो स्वतःशी समाधानानं म्हणाला, 'माझे उडण्याचे विचार हीच सफलता आहे, हाच खरा विजय आहे आणि तो संतुलित गतीत आहे.'

दोनशे चौदा मैल वेगानं उडणारा तो समुद्रपक्षी! तो एक विक्रमच होता. समुद्र पक्ष्यांच्या इतिहासातील ती पहिली घटना होती आणि या नव्या युगाचा शुभारंभ जोनाथनने केला होता. आपल्या सरावाच्या निवांत भागात त्यानं ही किमया केली होती.

आठ हजार फूट उंचीवर पंखांची सावकाश घडी करणे, हे करीत असताना झेप घेत राहणे आणि पुन्हा स्वतःला सांभाळत पलटी घेण्याचा शोधच त्यानं लावला होता आणि हे सगळं सरावानं, मेहनतीनं घडलं होतं.

पंखांचं एक टोक हळुवार एक इंच फिरविलं की प्रचंड गतीला चांगलंच वळण मिळतं, हे त्याच्या लक्षात आलं होतं. वेगात उडताना एका पंखाच्या मदतीनं वळण्याचा प्रयत्न करताच, बंदुकीतून सुटलेल्या गोळीसारखा गरगरा

फिरे. हा अनुभवही अगोदरचाच होता. वैमानिक आकाशात विमानाच्या कसरती करतात. तशा कसरती करणारा जोनाथन हा पृथ्वीतलावरचा पहिला समुद्रपक्षी ठरला होता.

इतर समुद्रपक्ष्यांशी बोलण्याची त्याला दिवसभरात फुरसत मिळत नव्हती. सायंकाळपर्यंत तो फक्त उडतच होता. आजही त्याने वैमानिकासारखे चक्राकार उड्डाण केले. हळुवार हेलकावे मारले. टोकाकडे गिर्रेबाज वळण घेतले. उलटी गिरकीची कसरत केली. आसाभोवती फिरणाऱ्या चाकासारखा स्वतःभोवती फिरला.

जोनाथन सीगल समुद्र किनाऱ्यावरील थव्यात मिसळला त्या वेळी खूप रात्र झाली होती. प्रचंड थकव्यानं भोवळ येऊ लागली होती. तरीही उतरण्यापूर्वी त्याने आनंदानं एक गोल फेरी मारली आणि हळुवार झेपावत जमिनीवर उतरला.

'आपल्या विक्रमाबद्दल ते जेव्हा ऐकतील, तेव्हा ते आनंदानं वेडेपिसे होतील', त्यानं विचार केला.

आता जगण्यासारखं काय उरलं आहे?

पुन्हा बोटीवर अन्नाच्या एका तुकड्यासाठी येणं म्हणजे मुष्टियोद्ध्यासारखं भकासपणे पुढं आणि मागं ठोसे लगावण्यासारखं आहे.

अशा जगण्याला काय अर्थ आहे?

एक मात्र शिकता आलं. अज्ञानातून आपली सुटका करून घेऊ शकलो. उडण्याच्या प्रेमातून कळलं, आमच्यात अत्युच्च बुद्धिमत्ता आहे. पारंपरिक कौशल्य आहे. उत्कृष्ट गोष्टींचा ध्यास आणि त्याचा शोध घेणारे आम्ही पक्षी आहोत. असं केल्याने आपण मुक्त होऊ शकतो.

लक्ष्यापर्यंत झेप घ्यायला आपण शिकू शकतो.

येणारं नवं वर्ष ओठ मिटून गाणं गुणगुणत आलं आणि अनेक चकाकणाऱ्या गोष्टींचं आश्वासन देत गेलं.

सगळे समुद्रपक्षी पंचायतीच्या बैठकीसाठी एकत्र जमले होते; आणि नेमका त्याच वेळी जोनाथन खाली उतरला. बऱ्याच वेळेपासून बैठक सुरू होती आणि बैठकीतले सगळे त्याची वाटच पाहत होते.

"जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल! असा मध्यभागी उभा राहा!"

एक वयस्क ज्येष्ठ समुद्रपक्षी अधिकारवाणीने म्हणाले, त्यांच्या आवाजात जरब होती. मध्यभागी उभा राहा याचा एक अर्थ अपमान होता, तर दुसरा ती सन्मानाची गोष्ट होती. मध्यभागी उभं करून अनेक वीरांचा सन्मान यापूर्वी त्यांनी केला होता.

जोनाथनने आजूबाजूला नज़र फिरविली. त्याच्या लक्षात आलं. सकाळच्या न्याहारीसाठी जमलेल्या थव्यात त्याला तितकी एकजूट जाणवली नाही. कळप फुटण्याची शक्यता दिसत होती.

'मला काही सन्मान नको, आणि मला पुढारी व्हायचीही इच्छा नाहीय. डोक्यावर आकाशाचं अथांग छत आहे. क्षितिजापलीकडे मला ज्याचं दर्शन झालं, जो विलक्षण आणि अद्‌भुत अनुभव मी घेतला, तो सर्वांना मला सांगावयाचा आहे'... तो मनाशीच जुळवाजुळव करीत होता.

निर्धारानं तो एक पाऊल पुढं सरकला.

"जोनाथन लिव्हिंग्स्टन," ते ज्येष्ठ पुढं म्हणाले, "तुम्ही अपमानास्पद कृत्य केलं आहे. त्याबद्दल असे मध्यभागी उभे राहा. बघू द्या सर्व बांधवांना तुम्हाला एकदा डोळे भरून."

गलबताच्या बाहेरील फळ्यांवर आदळल्यासारखं वाटलं जोनाथनला. गुडघ्यातील सगळी शक्ती निघून गेली आहे आणि आपले पंख कोणीतरी दाबून टाकत आहेत असं त्याला वाटलं. वादळाची भयान गर्जना कानात ऐकू येऊ लागली.

लज्जास्पद गोष्ट केल्यानं मध्यभागी उभं राहायचं? काय हा न्याय? त्यांना कळत नाही, आपण काय करत आहोत ते सगळंच चुकीचं चाललं आहे. जोनाथनच्या मनात चलबिचल सुरू होती.

"हा विवेकहीन बेजबाबदारपणा आहे." ते वयस्क गंभीर स्वरात एक एक निर्वाणीचा शब्द उच्चारू लागले, "समुद्रपक्ष्यांची परंपरा तू मोडली आहेस. प्रतिष्ठेचे उल्लंघन केले आहेस."

"अपमानकारकरीत्या मध्यभागी उभं केलं याचा अर्थ, तुला जातीबाहेर टाकलं आहे. तू आता बहिष्कृत आहेस. या हद्दपारीत तू तुझं स्वच्छंदी एकाकी जीवन समुद्रकिनाऱ्याच्या दूरच्या उंचकड्यांवर साजरं कर!"

जोनाथन ऐकत होता.

"जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल, तू एक दिवशी शिकशील. तुझ्या ध्यानात येईल, की बेजबाबदारपणाने हाती काहीच लागत नाही. हे जीवन म्हणजे अज्ञानाने भरलेल्या अंधार कोठडीतील जीवघेणा प्रवास आहे. यातून काही उमजत नाही. समजतही नाही. एकच गोष्ट हाती येते, या जगात आपण आलो, ते फक्त दोन वितीची खळगी भरण्यासाठी, म्हणजे दोन वेळेच्या अन्नासाठी धडपडणं आलं आणि जेवढा वेळ जीवंत राहणं शक्य आहे, तेवढ्या वेळात हे पंख फडकविणं."

जोनाथन येईपर्यंत ते सर्वजण थांबले होते. ते जणू त्याचीच प्रतीक्षाच करीत होते. उशीर झाला तरी ते थांबले असते; परंतु सर्वांनी कानानं ऐकणं आणि डोळ्यानं पाहणं नाकारलं. त्याच्याकडे असहकाराची पाठ फिरवून त्यांनी नकाराची घंटाच वाजवली होती.

हे सगळं स्वीकारून जोनाथन मजेत उडू लागला.

प्रत्येक दिवशी तो अधिकाधिक शिकत होता.

समुद्राच्या समांतर उडत गेल्यानं, पाण्याखालील दहा फुटांवरील माशांचा थवा लक्षात येतो. ते मासे दुर्मिळ, पण रुचकर असतात. त्यांची शिकार करण्याकरिता त्यांचा वेग लक्षात घेऊन अतिशय गतीनं पाण्यात सूर मारावा लागे आणि हे तो अनुभवानं शिकला होता. मासे पकडणाऱ्या बोटीवर आणि शिळ्या पावाच्या तुकड्यांवर आता गुजराण करण्याची आवश्यकता नव्हती.

दिवसभराच्या उड्डाणासोबत विश्रांतीची आवश्यकता होती. हवेत तरंगत असताना डुलकी काढायची क्लृप्तीही त्यानं शोधली होती. किनाऱ्याकडून समुद्राकडं जाणाऱ्या वाऱ्याच्या विरुद्ध दिशेला रात्री स्थिर तरंगत राहून तो झोपत असे. यात सूर्यास्त ते सूर्योदयाच्या काळात शंभर मैलांचा टापू व्यापला जाई. कधी कधी मोठ्या समुद्रधुक्याची गाठ पडे. यावेळी चटकन वर उसळी घेत धुक्यावरील चकाकणाऱ्या स्वच्छ आकाशातून उडत राही. यावेळी त्याची आतली सत्ता सगळं कामं नीट करवून घेई. इतर समुद्रपक्षी मात्र अशा वेळी धुकं आणि पावसाच्या नावानं बोटं मोडत जमिनीवर बसून राहत. अशा वेळी काय करावं, हे त्यांना समजत नसे. जोनाथन मात्र

पंचायतीच्या निर्णयापुढं कोणताही समुद्रपक्षी एक शब्दही बोलत नसे. पण आतापर्यंत गप्प बसून ऐकणाऱ्या जोनाथनचा आवाज चढला, "बेजबाबदारपणा? माझ्या बंधूंनो! कोण आहेत अधिक जबाबदार? जो पक्षी जीवनातल्या अधिक अर्थपूर्ण आणि चांगल्या हेतूंचा प्रयत्नपूर्वक शोध घेतो, नवं काही करण्यासाठी सतत धडपडतो, तो आहे बेजबाबदार? हजारो वर्षे आम्ही जगत आहोत. काय आहे या जगण्यात? दिवसभरात एखाद्या माशाचा तुकडा मिळाला की झालं समाधान. या पलीकडे काही करण्याचा, शोध घेण्याचा आम्ही कधी प्रयत्न केला आहे काय? की फक्त दोन वेळच्या अन्नाच्या शोधामागं नुसतं चाचपडणं म्हणजे जीवन आहे! मला जगण्याचा अर्थ सापडला आहे. तो अर्थ समजून घेणं म्हणजे स्वत:तील शक्तीचा शोध घेणं. ती कला हस्तगत करण्यासाठी निरंतर शिक्षणाची गरज आहे. त्यातूनच खरी मुक्ती आहे. तुम्ही माझं ऐकणार असाल, आणि मला सांगण्याची एक संधी दिली तर ती सांगू शकेन, की मला काय सापडलं आहे."

सगळा थवा अचेतन दगडांचा समूह बनला.

"समाजजीवनाचा नियम तोडलास तू." सर्व पक्ष्यांनी एका सुरात समाजनियमांचं स्तोत्र ऐकविलं. या जयघोषात त्यांनी आपापल्या कानांवर हात ठेवले आणि जोनाथनकडे सगळ्यांनी एकसाथ पाठ फिरवली.

जोनाथनने उरलेला दिवस एकाकी मजेत साजरा केला. त्यानं भरारी घेतली. दूरवरच्या उंच समुद्रकड्याकडे उडू लागला. एकाकीपण हे त्याचं दु:ख नव्हतं. आपण प्रयत्न केला. प्रयत्नानं हाती यश आलं, या यशाच्या अन् वैभवाच्या भरारीबद्दल ऐकून घ्यायला सर्वांनी नाकारलं, ही सल मात्र त्याला खोलवर सलू लागली.

वेगवान वाऱ्यावर स्वार होऊन दूरच्या कीटकांवर ताव मारी. उडणारे कीटक मटकावयाचे कसब त्याने अवगत केले होते.

एकेकाळी त्यांनं समुद्रपक्ष्यांच्या थव्यासाठी एक स्वप्न रंगविलं होतं. त्यांच्याकडून अपेक्षाही केली होती. ती त्यानं स्वतःच्या कष्टानं आणि प्रयत्नानं एकट्यानं पूर्ण केली.

उडावं कसं, हे तो अनुभवानं शिकला होता. आलेल्या अडचणी आणि संकटं त्यानं शिकण्याचाच भाग म्हणून स्वीकारला. यासाठी त्याला भरपूर किंमतही मोजावी लागली.

जोनाथन सीगलच्या हाती एक सत्य गवसलं होतं. आळस, भीती अन् राग हे समुद्रपक्ष्यांच्या दुःखाचं मूळ कारण आहे. हे दुःख त्यांच्या अल्पजीवनाचा शाप ठरतं. या सर्व गोष्टींना जवळ फिरकू दिलं नाही, मनातूनही दूर हाकललं की मर्यादेची बंधनं तटातट गळून पडतात. मग सुरू होतो मुक्तानंदाचा प्रवास आणि दीर्घायुषी सुंदर जगणं.









सगळे समुद्रपक्षी सायंकाळी परतले.

बघतात तर, जोनाथन एकटा शांतपणे आकाशात उडत होता. आकाश त्याचं आवडत अंगण झालं होतं. दोन समुद्रपक्षी बाजूनं उडत आले. त्यांनी जोनाथनकडे बघितलं. त्याचे दोन्ही पंख ताऱ्यांच्या प्रकाशात उजळून निघाले होते. रात्रीची हवा मंद होती. मैत्रीचा फिकट प्रकाश आसमंतात भरून होता आणि त्यासोबत होतं जोनाथनचं डौलदार उडण्यातील कौशल्य. त्याच्या पंखांची टोकं नेमक्यापणे आणि सातत्यानं एक एक इंच वळत होती.

जोनाथन एक शब्दही बोलला नाही. त्यानं त्या दोघांची परीक्षा घ्यायची ठरविलं. आजपर्यंत एकही समुद्रपक्षी ती पास झाला नव्हता. जोनाथनने आपल्या पंखांना जागीच पीळ दिला, ओले कपडे पिळल्यासारखा. तासाला एक मैल गती कमी केली. या दोन्ही पक्ष्यांनी त्यांची गती कमी केली. संथगतीनं त्या उडण्याच्या स्थितीला जणू कुलूपच घातले. हळुवार उडणं समजलं होतं त्यांना.

जोनाथनने पंखांची सावकाश घडी केली. डौलदार गिरकी मारली आणि एकशे नव्वद मैल वेगानं सूर मारला. दोघांनीही तशीच कृती केली. एखादी निर्दोष रेघ उमटावी, तसा आकार तयार झाला. तीच गती राखत वरच्या दिशेनं वळला. आणखी एक सरळ रेषाच हळुवार काढली गेली. ते दोघेही त्याच्या सोबतच होते.

एक विशिष्ट उंची गाठताच त्यानं उडणं सावरलं. इतक्या वेळची शांतता सोडत आनंदानं तो म्हणाला, "छान! फारच छान! कोण आहात तुम्ही?"

"आम्ही आपल्याच थव्यातील आहोत, जोनाथन! आम्ही तुझीच भावंडं आहोत." ते शब्द हळुवार उच्चारले होते; पण त्यात होता धीरोदात्तपणा,

"अधिक उंच ठिकाणी आणि त्यानंतर तुम्हाला घराकडे घेऊन जाण्यासाठी आम्ही आलो आहोत."

"घर? मला तर आता घरच नाही. मी आहे एक बहिष्कृत. सगळ्यांनी थव्याबाहेर हाकललेला एकटा. आपण उडत होतो ते ग्रेट माऊंटन विंड हे येथील सर्वात उंच टोक आहे. यावर काही शतकं उंच आपण उडत होतो. त्यापेक्षा अधिक उंच ठिकाणी हे माझं जीर्ण थकलेलं शरीर मी नाही आता उचलू शकणार."

"नाही नाही जोनाथन! तुम्ही नक्कीच उडू शकता. कसं उडायचं, हे तुम्हाला माहीत आहे. एक अध्याय जरी संपला असला, तरी दुसरा सुरू करण्याची वेळ आली आहे."

आतापर्यंत त्याच्या हृदयातील आत्मज्योतीनं प्रत्येक क्षणी जोनाथनला प्रवासाचा मार्ग दाखविला होता. उडताना प्रत्येक क्षणी तो या प्रकाशाचा पथदर्शक होता. उडण्याची ती प्रेरणा होती.

ते दोघे तरुण जे सांगत होते, ते बरोबर होतं.

त्याने अधिक उंच भरारी घेतली पाहिजे आणि त्याच बरोबर आपल्या जमावात घरी परतण्याची वेळही आली होती.

जोनाथनने आकाशात दूरवर नजर फिरविली. दूरची चंदेरी जमीन त्याला खुणावत होती आणि त्याच प्रेरणेनं तो क्षणाक्षणात खूप काही शिकला होता.

"चला, मी तयार आहे." मनाचा निश्चय करून तो म्हणाला. जोनाथनने पंख पसरले. सगळे आकाश कवेत घेत त्या तरुण तळपत्या उत्साही समुद्रपक्ष्यांसह झेप घेतली. काळोख पांघरलेल्या आकाशात ते गुडूप झाले.



भाग : दोन

तो स्वतःशी म्हणाला आणि हसला. एक स्वप्न होतं हृदयात बाळगलेलं. अत्युच्च ठिकाणी भरारी घ्यायची. त्या भरारीचा क्षण म्हणजेच स्वर्ग. त्या अवस्थेचा आदर करणं, तो मुक्तपणे अनुभवणं ही आनंदावस्था!

तो नुकताच पृथ्वीवरून आला होता. उंच ठिकाणच्या ढगांवर तो तरुण सोबत्यांसह उडत होता. समूहाची एक शक्ती होती. सोबतीची ऊर्जा मिळत गेली. आतापर्यंत त्याला ते तळंपते तरुणच चकाकत असल्याचे वाटायचे. त्या नवजवानांच्या संगतीनं तोही अधिक चकाकू लागला. सत्य हे होतं की त्याचे साथीदार तरुण होते. उडताना त्यांची साथसंगत होती आणि त्याची लक्ष्यापलीकडे पोहोचणारी सोनेरी दृष्टी उत्साही साथीदारांस नवसंजीवनी होती. यामुळे सगळ्या बाह्य आसमंताचा रंगच बदलून गेला होता.

त्याचं शरीर हे एक समुद्रपक्ष्यासारखं होतं- हाडामांसानी अन् पिसांनी साकारलेलं घरटं; पण साथ-संगतीच्या भावनेनं त्याच्या पंखात अधिक बळ वाढत गेलं आणि पूर्वीपेक्षाही तो चांगलं उडू लागला. त्यांना प्रश्न पडला, असं का होतंय? अर्ध्या श्रमात दुप्पट गती मिळते आणि ही दुप्पट गती म्हणजे पृथ्वीतलावरील सर्वोत्कृष्ट कामगिरी.

त्याचे कष्टकर मळलेले पंख या कामगिरीनं पांढऱ्या रंगासारखे चकाकू लागले. मऊशार पंखांना चंदेरी कडांची, कौशल्याची किनार लाभली होती. उजाळा दिलेली तळपणारी पत्रे जणू एकावर एक रचून ठेवली होती. या पंखात आणखी बळ भरण्यासाठी त्यानं पुन्हा आनंदानं उडण्यास सुरुवात केली. प्रथमच शिकणाऱ्या आज्ञाधारक विद्यार्थ्यांची जिज्ञासा अन् शिकण्याचं कुतूहल होतं त्यात.

दोनशे मैल वेगाची गती होताच, त्याला जाणीव झाली, की आपण आपल्या लक्ष्याच्या जवळ आलो आहोत. अपेक्षित उंची अन् गती या दोन गोष्टींचा ताळमेळ जुळणे हे यशाचं गमक असतं. आता तो दोनशे त्र्याहत्तर मैलापर्यंत पोहोचला आणि त्याला कळून चुकलं, आपण जेवढं जलद उडू शकतो, त्याची ही परिसीमा आहे. पुन्हा त्याला आतून टोचणी जाणवली. ही मंदगतीच आहे अजून! निकाल ऐकून तो नाउमेद झाला. या शरीराची शेवटी एक मर्यादा आहेचना! किती ताणायचं त्याला?

त्यानं मनाची समजूत घातली. यापूर्वीच्या सर्वात गतिमान उड्डाणापेक्षा या वेळेचं काम सरस आहे. प्रत्येक गोष्टीला, कृतीला शेवटी मर्यादा असते. प्रचंड कष्ट केले. मेहनत उपसली. शेवटी हाती काय? शारीरिक बिघाडाचे धनी होण्याची शक्यता. जर तुम्ही स्वर्गात असाल, तर मग कोणत्याही कृतीला बंधन नाही.

त्यांच्यासमोर रस्त्यात येत असलेला बारकासा धुरकट ढग बाजूला सरकला. जोनाथनच्या मागून सोबतीला असलेला पक्षी म्हणाला, "या आगमनाचे स्वागत असो, जोनाथन!" आणि तो हवेत विरल्यासारखा निघून गेला.

एका समुद्रावरून तो वाकड्यातिकड्या किनारपट्टीकडं येऊ लागला. या वेळी फार थोडे पक्षी समुद्रकाठच्या उंच कड्यावरून आडवेतिडवे उडत आकाशात रेखाचित्रं काढत होते. दूरवर उत्तर कोपऱ्यात, अगदी क्षितिजरेषेजवळ काही पक्षी उडत होते. प्रत्येकाची आपापली उडण्याची पद्धत होती. उड्डाणाच्या ठिकाणाकडे बघण्याची एक दृष्टी होती. त्यामागे त्यांचा विचार होता आणि त्याबद्दलचे प्रश्नही होते. चाकोरीबाहेर उडण्याचं काम फार थोडे पक्षी करायचे. या आकाशाखालील अथांग स्वर्गात समुद्रपक्ष्यांचे थवेच बागडायला हवेत; पण असं फारसं घडत नव्हतं आणि मला हा

थकवा का जाणवतो? एकाएकी असं का वाटावं? स्वर्गातल्या समुद्रपक्ष्यानं असं अधे-मधे प्रवासात थकायचं नसतं. दमायचं नसतं आणि झोपायचंही नसतं.

जोनाथन स्वतःला विचारू लागला, 'कुठं ऐकलं हे सगळं?' पृथ्वीतलावरच्या आठवणींच्या मडक्याला कधीच गळती लागली. तरीही पृथ्वी हेच महत्त्वाचं ठिकाण आहे. तिथंच सगळं शिकणं झालं. आज सगळे तपशील धूसर झाले असले तरी अन्नासाठी जीवघेणा संघर्ष आणि जातीबाहेरची बहिष्कृती हे वेगळं केल्याचं बक्षीस!

जोनाथनने समोर बघितलं. डझनभर समुद्रपक्षी त्याच्या भेटीसाठी किनाऱ्यावर सामोरे आले होते; पण एकाच्याही तोंडून शब्द निघत नव्हते. त्याला वाटलं, आपलं स्वागत होतंय आणि हेच आपलं घर आहे. तो एक लांबलेला दिवस होता त्याच्यासाठी. सूर्योदयाची आठवण कधीही राहणार नव्हती असा दिवस.

तो लगतच्या किनाऱ्याकडे वळला. पंखांची इंच इंच उघडझाप करीत हळुवार जमिनीवर उतरला. इतर समुद्रपक्षीही त्याच्या मागाहून उतरले; पण त्यांच्यातील एकानंही पंखाची विशेष फडफड केली नाही. वाऱ्याच्या संगतीनं त्यांनी झोका घेतला होता. चकाकणारे पंख आरामात ताणून दिले. डौलदार गिरकी घेतली आणि पायांच्या शिड्यासारख्या उपयोग करीत हळुवार जमिनीवर उतरले. सुंदर संतुलन होतं ते. हे सगळं होताना जोनाथनला त्राणच उरले नाही. अगदी गळून गेला. समुद्रकिनाऱ्यावर निःशब्द उभा राहिला आणि तशातच त्याचा डोळा लागला.

या दिवसांत उडत असताना जोनाथनच्या लक्षात आलं, की उरलेल्या आयुष्यात उडण्यासंबंधी अजून बरंच काही शिकण्यासारखं आहे. पण या शिकण्यात महत्त्वाचा फरक होता. तो जसा विचार करत होता, तसेच इथले

समुद्रपक्षीही विचार करायचे. इथं प्रत्येकाचा जगण्याचा आपापला एक दृष्टिकोन होता.

आपण जे करीत आहोत त्यात कौशल्याची आवश्यकता होती. त्याला प्राविण्यतेची जोड हवी. ते समुद्रपक्षी उडण्यात प्राविण्यता प्राप्त व्हावी म्हणूनच उडत होते. तोच त्यांचा आनंद होता. ते सर्वोत्कृष्ट पक्षी होते. त्यांचा दिवसातील तासन् तास उडण्याचा सराव एकचित्तानं सुरू होता. नवनव्या अन् अधिक प्रगत विमानाच्या कसरतीच्या हालचाली ते करीत होते.

आपण कोठून आलोत, याबद्दल अन् या जगाबद्दल जोनाथनला विसर पडला. त्यावेळी इतर पक्ष्यांचा थवा अगदी डोळे बंद करून आनंदानं उडत होता. त्याच वेळी हेही आठवलं की, हेच पंख पूर्वी भांडणाचं आणि अन्न शोधण्याचं शेवटचं साधन होतं. आनंदानं भरारी घेण्याच्या उद्देशाला सुरुवातीला फाटा बसला होता. आणि आता मात्र उडायचं होतं निर्भेळ आनंदासाठीच.

त्याला तो दिवस आठवत होता. सकाळची वेळ होती. प्रशिक्षकासोबत तो बाहेर पडला होता. त्या वेळी आपले पंख मिटवून सगळे समुद्रपक्षी समुद्रकिनारी विश्रांती घेत होते.

"सलिवन, सगळे कोठे आहेत?" त्यानं शांतपणे विचारलं. डोंगर कडेकपारीत निवारा शोधण्यापेक्षा प्रत्येकजण आपल्या घरात शांत होते, हे दुसऱ्याच्या मनातील विचार त्यानं सहज ओळखले होते. "आपल्या येथील ते सर्वजण का दिसले नाहीत या ठिकाणी? मी विचारतो, ते का नाहीत? जेथून मी आलो तेथे ते...."

"हजारो समुद्रपक्षी आहेत. मला कल्पना आहे चांगली!"

सलिवन संमतीदर्शक डोकं हलवीत म्हणाला. "मला इथं एकच उत्तर दिसतं आणि ते म्हणजे जोनाथन! मला माहिती आहे, तुम्ही लाखो पक्षी

आहात. आपण एका जगातून दुसऱ्या जगात जातो. एकासारखं दुसरा करतो; मात्र, आपण कोठून आलो आहोत, याचं भानच नसतं आपल्याला. आपला योग्य मार्ग कोणता? हेही समजत नाही. आपणास कोठे जायचं, याची आपणास काळजी नसते. फक्त आम्ही त्याक्षणी जिवंत असतो. तुम्हाला सांगता येईल काय? आपल्यापैकी किती जणांचं आयुष्य असंच नेहमीच्या रहाटगाड्यासारखं सुरू आहे? दोन वेळेस पोटाची खळगी भरणं म्हणजे काही जगणं नाही. आपसात छोट्या-मोठ्या कारणांकरिता झगडून राहणंसुद्धा जिवंतपणाचं लक्षण नाही. या थव्याचा अधिकार आपल्याकडेच असावा, एवढीच सत्तेची महत्त्वाकांक्षा, हीच अंतिम शक्ती मुळीच नाही. या सर्व गोष्टींहून जगणं अधिक महत्त्वाचं आहे. ही जाणीव अगोदर नव्हती.

"आपल्या सभोवती हजारो पक्षी जगत आहेतच, जॉन! अगणित असतील ते. ते पक्षी नेहमीसारखं जगत आहेतच. आम्हीही शिकत होतो; पण आम्ही ठरविलं, प्रत्येक गोष्टीत प्रावीण्य मिळविता आलं पाहिजे. आमची ही कल्पना नंतर काही पक्ष्यांनी उचलली. प्रयत्न केला. त्यांनाही कळून चुकलं की, जगण्याचा उद्देश म्हणजे प्रत्येक कृतीतील परिपूर्णता! आणि आपल्या मागाहून येणाऱ्याकरिता ती दिशादर्शक ठरत असते. हाच त्रिकालाबाधित नियम सर्वांना लागू होतो.

"दररोजच्या जगण्यातून आम्ही शिकत गेलो. पुढचा प्रवास सहज होत गेला. बऱ्याचदा पराभवाचं ओझंही कधी कधी डोक्यावर येतं. नीट शिकणं होत नाही; पण न थांबता प्रवास आणि शिकणं सुरू ठेवलं पाहिजे."

त्यानं आपले पंख ताणले. वाऱ्याच्या दिशेनं तोंड फिरवलं, "पण जॉन!" तो पुन्हा सांगू लागला, "ही एक अवस्था येते. तिच्यापर्यंत पोहोचण्यासाठी शिकणं आणि प्राप्त झालेलं अमलात आणणं सुरूच असतं. असं जर केलं तर मग वेगळ्या हजारो जीवनांचा जीवनानुभव घेण्याची गरज नाही."

क्षणात त्यानं विमानाच्या उड्डाणासारखी झेप घेतली आणि पुन्हा सराव सुरू केला. वर्तुळाकार गिरकीचा क्षण थोडा अवघड होता. अर्ध्या उलट्या कोलांटीच्या वेळी जोनाथनला खालचा आणि वरचा विचार करावा लागत होता. परतीची गिरकी घेताना पंखांनाही हळुवार बाक बसत होता, आणि त्याचा सुंदर मिलाप प्रशिक्षकाच्या उडण्याशी तंतोतंत जुळत होता.

"आपण पुन्हा प्रयत्न करूयात", सलिवन पुन्हा पुन्हा प्रोत्साहन देऊ लागला. "चला, पुन्हा प्रयत्न करा!"

"छान!" शेवटी पाठीवर शाबासकीची थाप मिळाली आणि ते चक्राकार उडण्याचा सराव करू लागले.

एके दिवशी सायंकाळची वेळ होती. काही समुद्रपक्षी रात्री बाहेर फेरफटका मारण्यास जाणार नव्हते. ते किनाऱ्यावर वाळूवर एकत्र जमले. त्यांचा विचारविनिमय सुरू झाला.

सगळं बळ दोन पायात एकवटून जोनाथन वयस्क समुद्रपक्ष्याजवळ आला. सगळ्यांचा असा ग्रह झाला होता की, हे वयस्क आता फार काळ या जगात राहणार नाहीत.

"चियाँग बाबा...." काहीसा घाबरत तो म्हणाला. वयस्क समुद्रपक्ष्यानं त्याच्याकडे दयाळूपणे पाहिलं.

"हं, बोल माझ्या पोरा!" हुकमी आवाज होता. शब्दात जरब होती. वय झालं होतं आणि त्याचं शरीरही दुर्बल झालं होतं; पण थव्यातील नियम मोडलेल्या कोणत्याही पक्ष्याला तो हाकलू शकत असे. एवढंच नाही, तर सर्व तऱ्हेच्या उड्डाणातही तो पारंगत होता. दुसरे मात्र हळूहळू शिकत होते.

"चियाँग, हे जग काही स्वर्ग नाही, होय की नाही?"

ते वयस्क प्रमुख चंद्रप्रकाशात मंद हसले.

"तू पुन्हा शिकू लागलास, जोनाथन?" त्यांनी विचारलं.

"तसं म्हणता येईल. बरं, इथली खबरबात काय आहे? आमचा हा प्रवास ठीक दिशेनं सुरू आहे काय? खरंच स्वर्ग म्हणून एखादं ठिकाण अस्तित्वात आहे की नाही?"

"नाही, जोनाथन! तशी जागाच अस्तित्वात नाही. स्वर्ग नावाचं असं ठिकाणही नाही. तसाच तो काळही नसतो. शेवटी तुम्ही जे करता, त्या गोष्टीतली पारंगतता हाच खरा स्वर्ग आहे." एवढं सांगून क्षणभर तो शांत झाला. त्याच्याकडे बघत विचारलं, "तू खूप वेगानं उडणारा पक्षी आहेस, होय की नाही?"

"मी... मला गती आवडते." जोनाथन म्हणाला; पण त्या प्रौढीला त्यानं लगाम घातला. वयस्कप्रमुखाने हे ओळखलं. त्याच्या वागण्या-बोलण्याचा त्याला अभिमान वाटला.

"जोनाथन, ज्या क्षणी तुझ्या उडण्यात निर्दोष अत्युच्च गती असते, त्याच वेळेस तू स्वर्गाला स्पर्श केलेला असतो. ती निर्विवाद स्थिती हाच खरा स्वर्ग. याचा अर्थ असा नाही की, तू एका तासात हजार मैल वेगानं उडतो की लाख मैल! अगदी प्रकाशाच्या गतीनं उड्डाण कर! गतीच्या आकड्यांना शेवटी एक मर्यादा असतेच; पण पारंगत उडण्याला मात्र अशी कोणतीही मर्यादा असत नाही. निर्दोष गतीनं उडत राहणं एवढंच त्या ठिकाणी मुख्य सूत्र असतं."

कोणतीही सूचना न देता चियाँग अदृश्य झाला आणि पन्नासेक फूट अंतरावर पाण्याच्या कडेला अवतरला. डोळ्याचं पातं लवण्यासाठी जेवढा क्षण लागतो तेवढ्या क्षणात हे घडलं होतं. पुन्हा तो तसाच गायब झाला आणि सेकंदाच्या एक हजाराव्या भागाच्या आत पुन्हा समोर आला. जोनाथनच्या खांद्यावर बसला.

"आहे की नाही किमया?" त्यानं विचारलं.







जोनाथनचे डोळे दिपले. स्वर्ग काय असतो, हे विचारणं तो क्षणभर विसरून गेला.

"कसं जमतं तुम्हाला हे? आणि यावेळी काय वाटत असतं? किती दूरपर्यंत तुम्ही उडू शकता?"

"तुम्ही कोणत्याही ठिकाणी कधीही जाऊ शकता. फक्त तुमची तशी इच्छाशक्ती हवीय आणि आतल्या आवाजानं प्रोत्साहन द्यावयास हवं." वयस्क म्हणाले, "मनात आलं की प्रवास सुरू. त्यामुळे मी सगळीकडे जाऊन येतो."

त्याने दूरवरच्या अथांग सागरावर नजर फिरवली.

"हे सगळं विचित्र आहे. काही समुद्रपक्षी निर्दोष उडण्याचा उपहास करतात. उडणाऱ्यांची यात कुत्सित टिंगलच असते. त्यांना वाटतं, उडायचं तर चार चौघांसारखं उडावं. जे उडण्यात निष्णात असतात, ते प्रवासाचा हेतू बाजूला ठेवून हव्या त्या इप्सित स्थळी वेळीच पोहोचतात. ध्यानात ठेव जोनाथन, स्वर्ग हे कुठलंही ठिकाण नाही. तशी कालाची स्थितीही नाही. स्वर्ग आणि काल तसे अर्थहीन आहेत. खरं तर स्वर्ग म्हणजे..."

"त्या सारखं उडणं तुम्ही मला शिकवाल का?" माहीत नसलेलं आणखी एक शिखर सर करण्याच्या जिज्ञासेनं कातर स्वरात जोनाथनने विचारलं.

"बेलाशक! तुझी आंतरिक ओढ साद घालत असेल तर मी तयार आहे."

"माझी इच्छा आहे. आपण कधी सुरुवात करायची?"

"या क्षणीसुद्धा सुरुवात करता येईल. आहे तुझी तयारी?"

"हो! तुम्ही म्हणता तसं उडणं शिकायचं आहे मला." जोनाथन म्हणाला. एका अद्‌भुत प्रकाशाची किरणं अंतःपटलावर चमकून गेली.

"सांगा, मी आता काय करू?"

चियाँग सावकाश बोलत होता आणि लक्षपूर्वक ऐकणाऱ्या या तरुण समुद्रपक्ष्याकडे अपार कुतूहलानं पाहू लागला.

"जसा आपण मनात विचार करतो, त्याच गतीनं उडायचं. जसे आपले मुक्त विचार चौफेर कुठेही पोहोचत असतात, तसंच हे उडणं असावं." तो म्हणाला, "आपण कोठपर्यंत पोहोचलो हे आपणस माहीत असतं. त्या ठिकाणाहून पुढच्या टप्प्याकडे जाण्याची सुरुवात करायची."

चियाँगने एक सूत्र सांगितलं. ती एक युक्ती होती. आपल्या शरीर मर्यादांच्या बंधनात अडकून नाही पडायचं. तुला माहीत आहे, आपल्या पंखांची लांबी बेचाळीस इंच आहे. या पंखांची क्षमताही एवढीच आहे. आपल्या उडण्याच्या कृतीचा मनातला नकाशाही याच मर्यादेचा आहे. या मर्यादांच्या पिंजऱ्यात नाही अडकून घ्यायचं विचारांना!

सूत्र असं आहे.

या निसर्गात सर्वत्र जीवन चैतन्यरूपानं काठोकाठ भरून वाहत आहे. ती आहे एक अलिखित निर्दोष संख्या. ते चैतन्य सर्वत्र आहे. अवकाशात आहे आणि सर्व कालालाही त्यानं व्यापलेलं आहे.

जोनाथनने भयंकर चिकाटीनं काम सुरू ठेवलं. दिवस आणि रात्र. सूर्योदयापूर्वी सुरू झालेली उडण्याची साधना मध्यरात्र उलटून गेली तरी सुरूच होती आणि त्यावेळी पंखांच्या रुंदीएवढं अंतरही त्यानं काटलं नव्हतं. त्याचं हे स्थिर उडणं म्हणजे तरंगण्याची ध्यानावस्थाच होती जणू!

"तुझ्या मनात उडण्याबद्दल जो विश्वास आहे, तो विसरून जा." चियाँगने वेळीच सूचना केली. पुढं तो आणखी म्हणाला, "उडण्यासाठी फक्त स्वतःबद्दलचा विश्वासच पुरेसा नाही. उडण्याची जाण हवी. खोलवरची ऊर्मी पाहिजे. एखादी गोष्ट मनासारखी करू लागलो, की आतला आवाज येतो ना प्रोत्साहनाचा, अगदी तसं आहे हे! चल, आता पुन्हा प्रयत्न कर..."

एक दिवस जोनाथन किनाऱ्यावर उभा होता. डोळे मिटलेले. घेतलेला अनुभव एकचित्तानं पुन्हा अनुभवत होता आणि एकदम प्रकाशाचं दारच उघडलं.

चियाँग जे सांगत होता, त्याचा अर्थ हाती आला.

"हेच सत्य आहे. माझा प्रवास योग्य दिशेनं सुरू आहे. एका समुद्रपक्ष्याच्या अंगी ही अमर्याद अद्‌भुत शक्ती कोठून आलीय?

आनंदाची एक लाट अंगावर येत आहे, असं त्याला वाटू लागलं. सामोरं गेलं पाहिजे.

"छान!" चियाँगने आनंदानं प्रतिसाद दिला. त्याच्या शब्दात विजयानंदाची किणकिण होती.

जोनाथनने हळुवार डोळे उघडले.

अनोख्या समुद्रकिनारी तो ज्येष्ठ मार्गदर्शकासोबत उभा होता. काठावरच्या झाडांच्या फांद्या अथांग सागराच्या पृष्ठभागाला मायेचा स्पर्श करीत होत्या. आकाशातील आणि सागरातील सोनेरी सूर्यबिंबाची जोडी जणू त्याच्या बाजूला झुकली होती.

"अखेर तू ती विद्या आत्मसात केलीस." चियाँग खुशीत म्हणाले, "पण तुझ्या संतुलनासाठी अजून थोड्या परिश्रमाची आवश्यकता आहे."

हे ऐकून जोनाथन गोंधळला.

'मग मी कोठे आहे', तो स्वतःलाच विचारू लागला.

हा परिसर वेगळा होता. ज्येष्ठ मार्गदर्शक त्यामुळे पूर्ण प्रभावित झाले नाही. उलट, जोनाथनच्या मनातील प्रश्न बाजूला सारत ते म्हणाले, "आपण वेगळ्या ग्रहावर आहोत. वर निळ्या आकाशाचा मंडप घातलेला आहे आणि सूर्याचे दुहेरी बिंब आकाश आणि खालील जलाशयात दिसत आहे."

जोनाथनने आनंदाचा चित्कार काढला. पृथ्वी सोडल्यापासूनचा हा पहिलाच हुंकार होता. त्याच्या तोंडून सहज शब्द आले,

"याचा अर्थ योग्य मार्गावर आहोत."

"अर्थात! तुझा प्रवास योग्य दिशेनं होत आहे, हे एकदा स्वतःस समजलं की पुढची वाटचाल निर्धोक होत राहते. आता आपण तुझ्या संतुलनाबद्दल..."

ते परत आले त्यावेळी रात्र झाली होती.

किनाऱ्यावरचे इतर पक्षी जोनाथनकडे बघत होते. त्यांच्या सोनेरी डोळ्यांत त्याच्याबद्दल आदरच भरून होता आणि किंचितशी भीतीही! तो ज्या ठिकाणाहून गायब झाला होता, तेव्हापासून ते सगळे त्याला शोधतच होते.

सगळ्यांच्या अभिनंदनाचा स्वीकार करण्यासाठी तो क्षणभर थांबला आणि नम्रपणे म्हणाला, "मी इथं नवखा आहे. मी नुकतीच शिकायला सुरुवात केली आहे. तुमच्याकडूनही मला खूप काही शिकायचं आहे."

"हे तुझ्या तोंडून ऐकून, आमचा विश्वासच बसत नाही, जोन!" त्याच्याजवळ उभा राहत सलिवन उद्‌गारला. "गेल्या दहा हजार वर्षांत तुझ्यासारखा समुद्रपक्षी मी या जगात पाहिला नाही, ज्याला नवं काही शिकण्याची मुळीच भीती नाही."

सर्व थवा निःशब्द शांततेत बुडाला. गोंधळलेला जोनाथन अस्वस्थपणे चुळबूळ करू लागला.

"तुझी तयारी असेल तर आपण वेळीच काम सुरू करू." चियाँग म्हणाला, "सुरुवातीला तू पूर्वीच्या अन् नव्यानं शिकलेल्या उड्डाणांचा सराव कर. त्यानंतर तुला सर्वात अवघड उड्डाणाकरिता तयार राहायचं. ते जितकं अवघड आहे, तितकंच जोरकस झेप घेण्याचं त्यात आव्हान आहे आणि अशा आव्हानात एक आनंदच असतो आणि शेवटी तुला उत्तुंग भरारी घ्यायची आहे आणि त्या वेळी तुला होणारं ज्ञान प्रेमाचं अन् दयाळूपणाच्या किमयेचं असेल. ही असेल आनंदयात्रा."

एक महिना उलटला अथवा महिना लोटल्यासारखं वाटलं त्यांना. या शिकण्याच्या काळात जोनाथन एका लोकविलक्षण दर्जानं शिकत गेला. साध्या साध्या अनुभवातून प्रज्ञेच्या विविध छटा उलगडत गेल्या. ज्येष्ठ प्रशिक्षकाचा खास विद्यार्थी म्हणून सगळे त्याला ओळखू लागले. सागरातील जलप्रवाह आणि आकाशातील वाऱ्यांच्या झोताशी पंख जुळवून घेत, नव्यानव्या कल्पना आत्मसात करीत गेला.

आणखी एक दिवस उजाडला आणि चियाँग अदृश्य झाला.

त्याला चियाँगचं शांतपणे सांगितलेलं बोलणं आठवलं.

तो म्हणाला होता, "नवं शिकणं आणि त्याचा सराव करणं ही साधना आहे. साधनेत सातत्य हवे. सातत्याने सहजता येते. सहजतेतून निर्दोषता तयार होते. ही पारंगतताच मग जीवनातील मुख्य मूल्य बनतं. म्हणून त्याचा ध्यास सुरू ठेवा. मधे कधीही थांबू नका." तो सगळ्यांना पदोपदी धोक्याची घंटा वाजवावी, तसा बजावत राही. "आयुष्य हा एक प्रवास आहे. या प्रवासाचं अदृश्य परिपूर्ण तत्त्व समजून घेण्याची पराकाष्ठा करणं म्हणजेच आनंदाचा साक्षात्कार. हे दुसरं तिसरं काही नाही. समाधानाची मनाची अवस्था आहे. त्यासाठी प्रयत्न हेच सूत्र ध्यानात ठेवा."

जसा तो हे सांगत जाई, तसे त्यांचे पंख अधिकाधिक तळपू लागत. आत्मविश्वासाच्या या सांगण्याचं तेज त्याच्या अंगाअंगातून झळके आणि मग बाकी समुद्रपक्ष्यांना त्याकडे नजर टाकणं जड जाई.

"जोनाथन," तो समाधानाने बोलू लागला. जणू तो निरोपाचे शब्दच उच्चारित असावा. "आता तू प्रेमाबद्दल विचार कर." आणि चियाँग निघून गेला.

आता पुन्हा कधी भेट होणार?

दिवस जात होते. तो विचार करत होता. तेव्हा त्याला आढळू लागलं की तो ज्या पृथ्वीवरून आला, त्याचाच विचार करीत होता. त्यानं विचार केला, त्याला इथं खूप काही कळलं होतं. अनुभवास मिळालं होतं. त्याचा एकदशांश अथवा एक शतांश जरी पृथ्वीवर उमजलं असतं तर, या आयुष्याला अधिक चांगला अर्थ प्राप्त झाला असता.

तो वाळूत उभा राहिला. डगमगताच त्याला आश्चर्य वाटू लागलं. मागच्या बाजूनं उडणारा एखादा समुद्रपक्षी त्याची उडण्याची मर्यादा ओलांडण्यासाठी प्रयत्न करीत आहे. विशेष प्रयत्नपूर्वक उडणं आणि साधा प्रवास यातील फरक बघितला तर एखाद्या बोटीवर पावाच्या आतील मऊ भागाचा तुकडाच हाती आल्यासारखं होतं. समुद्रपक्ष्यासमोर सत्य कथन केल्याचं प्रायःश्चित्त म्हणजे जातीबाहेर फेकणं.

पृथ्वीकडे परत जाण्याची जोनाथनला जशी ओढ लागली, तसं निसर्गात घडणाऱ्या प्रत्येक स्थित्यंतराकडे अधिक प्रेमळपणे बघण्याचा सराव करू लागला. प्रत्येक कृतीत तो अपार मेहनत करी. या वेळी निसर्गातील विविध रंगातून त्याला उदात्त ममतेचा अनुभव येई. पूर्वकाळातील एकाकीपणाची कोळिष्टके वगळता, वर्तमानात जणू नवा जन्म झालेला तो एक कुशल प्रशिक्षक बनला होता. थव्याच्या प्रमुखानं स्वतःतील आत्मबळात डोकावायला सांगितलं. ते बघणं म्हणजे सत्याचा शोध!

त्याने उत्तुंग उडताना जे अनुभवलं, उघड्या डोळ्यांनी आकाशात चौफेर झेप घेतली, तो होता जगण्यातला साक्षात्कार! आणि मग सुरू झाला त्यांचा निरंतर प्रवास. प्रत्येक गोष्टींबद्दल प्रेम जाणवू लागलं. जो आनंद स्वतःला झाला, जे सत्य उमगलं, ते इतरांना वाटून देणं म्हणजे त्यात वाढ होणं.

सुलिवनला या कामगिरीबद्दल थोडी शंका होती. एक निपुण आपल्या गतिमान विचारासोबत तशीच उत्तुंग झेप घेत होता आणि तेच इतरांना शिकविण्याकरिताही मनापासून धडपडत होता.

"जोन, तुला आठवतं का? तुला सर्वांनी एकवेळ बहिष्कृत केलं होतं. तुझ्या काळातील एकही समुद्रपक्षी तुझ्या आजच्या या कर्तबगारीबद्दल,

निपुण भरारीबद्दल ऐकायला तयार नाही. त्याबद्दल अवाक्षरही बोलायला तयार नाही. यासंदर्भात एक वाक्प्रचार तुला ठाऊक आहे काय? आज मला तो खरा वाटू लागलाय.

"समुद्रपक्षी फक्त दूरचे सर्वात उंच उडणारेच पाहतो"

ज्या समुद्रपक्ष्यांबद्दल तू सांगत आहेस, ते आता समुद्रकिनारी उतरले आहेत. कर्कश्श आवाज करत आपसात भांडत आहेत. तुझ्या कल्पनेतल्या स्वर्गापासून ते हजारो मैल दूर आहेत आणि तू त्यांना ते उभे आहेत तेथून स्वर्ग दाखवू इच्छितो. जोन, ते स्वतःच्या पंखांचं टोकसुद्धा बघू शकत नाहीत. तू इथं राहा आणि या तरुण समुद्र पक्ष्यांना मदत कर. दूरवरच्या आकाशात क्षितिजापलीकडे उंच बघण्याची, आपल्या पंखात बळ भरण्याची त्यांच्यात कुवत आहे. तुला जे शिकवायचं, त्यांना शिकव. त्यांचं आत्मबळ वाढव."

सलिवन थोडा वेळ शांत झाला. पुन्हा स्वतःशी म्हणाला, "हे काय आहे? चियाँग त्याच्या जुन्या जगात परत तर गेला नाही ना? मग तू आज कुठं आहेस?"

सलिवन सांगत होता त्यातील शेवटचा मुद्दा अगदी बरोबर होता. समुद्रपक्षी दूरचे सर्वांत उंच उडणारेच पाहतो.

जोनाथनने राहायचं ठरविलं. नव्यानं आलेल्या तरुण पक्ष्यांसोबत काम सुरू केलं. ते सगळे तल्लख होते. पाठ समजून घेण्यात जलद होते. शिकायची इच्छा होती.

पुन्हा जोनाथनला जुन्या विचारांनी घेरलं. त्यातून त्याला बाहेर येता येईना. तो विचार करू लागला. या पृथ्वीतलावर एक-दोन समुद्रपक्षी नक्की आढळतील, जे माझ्या कल्पनेतलंसुद्धा शिकू शकतील. ज्या दिवशी सगळ्यांनी आपल्याला जातीबाहेर हाकललं, त्या दिवशी सुलिवन भेटला नसता तर? काय हाती शिल्लक राहिलं असतं? आणि काय शिकता आलं असतं?

"सुलिवन, मला परत गेलं पाहिजे." निर्धारानं तो शेवटी म्हणाला, "तुझे विद्यार्थी चांगलं काम करताहेत. नव्यानं येणाऱ्यास ते उत्तम प्रकारे मदत करू शकतील."

सुलिवनने काळजीने उसासा टाकला, पण त्यानं त्याच्याशी वाद वाढविला नाही. "तू आमच्यात नाहीस, याची आम्हा सर्वांना राहून राहून आठवण येत राहील, जोनाथन." एवढंच तो म्हणाला.

"सुलिवन, असा विचार करणं म्हणजे माझ्यासाठी लांछनास्पद आहे." जोनाथनच्या आवाजात दुःख जाणवत होतं. "मूर्खासारखं बोलू नकोस. आपण दररोज कशाचा सराव करत असतो? जर आमची मैत्री ही फक्त अवकाश आणि काळ यावरच अवलंबून असेल, आणि जेव्हा आम्ही यावर मात केली तर, आपलं बंधुत्वाचं नातं संपवून टाकणार काय? अवकाश कवेत घेणं वगैरे सगळं इथंच राहणार आहे. काळावर मात करणे म्हणजे आपल्या जवळ उरतो फक्त हा क्षण. याला आपण वर्तमान म्हणतो. इथं आणि या क्षणात आपण एक दुसऱ्यास एकदा अथवा दोनदा पाहत असतो."

सुलिवन हसला.

"वेडसर पक्ष्या!" काळजी करत तो म्हणाला, "जर कोणी एखाद्यास जमिनीवरून एक हजार मैल बघण्यास सांगितलं, तर तो नक्की जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल असेल."

सुलिवन वाळूकडे बघत म्हणाला, "भेटूयात जोन, मित्रा!" त्याचे शब्द सादळले होते.

"गुडबाय, सुली! आपण पुन्हा नक्की भेटूच." हे सांगत असताना जोनाथनच्या मनात दूरवर किनाऱ्यावरील आणखी एका थव्याची प्रतिमा तरळू लागली. तो मनाशी म्हणाला, "मी काही फक्त हाडामांसाचा आणि पंखांचा सांगाडा नाहीय. उत्तुंग भरारीचं स्वप्न हृदयाशी बाळगत, जगण्याचं स्वातंत्र्य हा माझा श्वास आहे. उडण्यातील आनंद हीच मुक्ती आहे. या ध्यासाआड कोणतेही बंधन येऊ शकणार नाही. मला उडत राहावं लागणार आहे."

प्लेचर लिंड सीगल एक नवजाण होता. त्याला माहीत होतं, कोणत्याही पक्ष्याला कोणाही थव्याकडून वाईट पद्धतीची वागणूक मिळाली नव्हती. कोणावर अन्यायही झाला नव्हता.

'ते जे सांगत आहेत, त्याबद्दल मी काळजी करत नाही.' त्यानं विचार केला. दूरवरच्या उंच कड्याकडे उडू लागताच त्याच्या मनःपटलावरील कल्पनाचित्र अंधुक झालं. एका ठिकाणाहून दुसरीकडं रमत गमत उडण्यापेक्षा उंच आकाशी दूरपर्यंत झेप घेण्यात अधिक मजा आहे. ही मजा काय आहे? उडण्यातला आनंद! जवळचं कानाशी गुणगुणाऱ्या मच्छरास मिळतो का हा आनंद? वयस्क समुद्रपक्षाभोवती एक आदराची कसरत केली की संपलं का काम? काय मजा आहे या सगळ्या कृतीत? आणि त्या सगळ्यांनी मला जातीबाहेर घालण्याची शिक्षा केलीय.

आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय, असा सगळा प्रकार!

"उडायला शिकणं ही खरी प्रतिष्ठा आहे. आपलं कर्म नीट करण्यात हे सगळं मिळून जातं. ते माझ्याबद्दल काय विचार करतात, याची मी चिंता करत नाही. आकाशात भरारी घेणं काय आहे, हे मी त्यांना दाखवून देईन. तरीही ते असाच विचार करत राहिले, तर ते सगळंच बेकायदेशीर ठरेल आणि मला त्यांच्या अशा वागण्याबद्दल खूप वाईट वाटेल."

त्याचा आतला आवाज साद देऊ लागला. तो हळुवार आणि शांत असला तरी त्यामुळे तो अविचलित झाला. हवेत मनसोक्त स्थिर तरंगत असताना अडखळला आणि थोडा डगमगला.

"त्या पक्ष्यांचा राग धरू नको, प्लेचर! तुला त्यांनी हाकललं, बाहेर काढलं. यामुळे तुझ्यापेक्षा तेच आतून दुखावले आहेत. न दिसणारी इजा त्यांना झाली आहे. एक दिवस असा येईल, त्यांनाही आपली चूक उमजेल. तू आता ज्या दृष्टीनं पाहतो आहेस, विचार करतो आहेस, तेही त्यांना समजू लागेल. त्यांची अडचण तू समजून घे आणि त्यांना क्षमा कर."

त्याच्या उजव्या पंखाच्या टोकाजवळ एक इंच अंतरावरून जगातील सर्वात पांढरा शुभ्र समुद्रपक्षी उडत होता. विनासायास संथपणे तो उडत होता. त्याचा एकही पंख वरखाली हालत नव्हता आणि त्या बुद्धिमान पक्ष्याची गतीही प्लेचरच्या सर्वोच्च वेगाएवढीच होती.

त्या तरुण पक्ष्याचा क्षणभर गोंधळ उडाला.

"हे काय चालू आहे. तो वेडा तर नाही ना? मी जिवंत आहे का मेलो? मी काय बघतोय हे?"

त्याचा आवाज खोल गेला होता, पण शांतही वाटत होता. विचारांत आवाज मिसळून गेला होता. तो उत्तराची अपेक्षा करू लागला.

"प्लेचर लिंड सीगल, तुला उडायचं आहे काय?"

"हो, मला उडायचंय."

"प्लेचर लिंड सीगल, ज्यामुळे तुझ्या कळपाचा तुला विसर पडेल असं उडायचं आहे काय? आणि लक्षात ठेव! हे शिकून घे. तुला एक दिवस त्यांच्याकडे परत जावंच लागेल आणि त्यांना मदतही करावी लागेल."

त्या उदात्त कौशल्यात खोटेपणाचा लवलेशही नव्हता. हे करण्यात प्रौढीही नव्हती आणि यामुळे प्लेचर सीगल किती दुखावला हे बघणंही नव्हतं.

"मी करीन सगळं." प्लेचरने हळुवारपणे कबूल केलं.

"तर मग, प्लेचर." देदीप्यमान पक्षी त्यास आनंदानं म्हणाला, "आपण समांतर उड्डाणाने सुरुवात करू."



भाग : तीन

दूरवरच्या उंच कडक्यावर जोनाथन हळुवार गोलाकार उडत होता.

त्याचं सर्वत्र बारीक लक्ष होतं. नवखा नवतरुण फ्लेचर मात्र निष्णात विद्यार्थ्यासारखा उडत होता. तो बलवान होता. पंखात रग होती. सडपातळ असल्याने हालचालीत सहजता होती. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे नेत्रदीपक डौलदार झेप घेताना शिकण्याची ऊर्मी अजूनही पूर्वीसारखीच होती.

एका मिनिटात तो इथं येई. करड्या रंगाच्या पंखानं डोळ्याच पातं लवतं न लवतं तोच गिरकी घेऊन पंख फडफडवीत पुन्हा झेप घेई. त्यावेळी त्याचा वेग असे एकशे पन्नास मैल एका तासात. आपल्या प्रशिक्षकाच्या बरोबरीने कामगिरी करीत होतो. त्यानं एकाएकी मधेच वेगळा प्रयत्न केला. लंबरेषेत सोळा वेळेस स्वतःभोवती गिरक्या घ्यायच्या आणि तो मोठ्याने अंक मोजू लागला.

"आठ... नऊ.... दहा... जोनाथन बघा! मी हवेच्या वेगापेक्षा जास्त वेगानं पळत आहे. अकरा... मला तुमच्यासारखी चांगली, टोकदार आणि क्षणभर स्थिर... थांबणारी झेप घ्यायचीय. बारा... मला तसं उडवून दाखवा.

तेरा... हे आता राहिलेत शेवटचे फक्त तीन गुण... त्याच्याशिवाय मी... चौदा...ओऽओऽ"

अत्युच्च ठिकाणाहून ढकलल्यासारखा वाईट रीतीने तो कोलमडला. त्यावेळी त्याचा स्वतःबद्दलचा राग आणि संताप एकवटून उसळून आला.

तोल जाऊन तो पाठीवर कोलमडला. एकाएकी झालेल्या पराभवानं संतापला. त्वेषानं उसळला. पाठीच्या कण्यावर जोर देऊन स्वतःला सावरलं. प्रचंड थकव्यानं धापा टाकू लागला. त्या वेळी त्याच्या लक्षात आलं, तो प्रशिक्षकापासून शंभर फूट खाली घसरला होता.

"जोनाथन, माझ्या सोबत तू तुझा कामाचा वेळ व्यर्थ खर्च करीत आहेस. मी असा बथ्थड! मी कितीही प्रयत्न केला, धडपड केली, तरी मी त्या स्थितीला पोहोचू शकणार नाही."

जोनाथन सीगलने खाली त्याच्या दिशेनं बघत मान डोलावली.

"तू ज्या पद्धतीने वर उसळत जोरकस सुरुवात केलीय, याप्रकारे तुला त्या स्थितीला पोहोचता नाही येणार. प्लेचर, तुला माहीत आहे काय? तासाला चाळीस मैलांचं सुरुवातीलाच नुकसान झालंय. याउलट, तू सुरुवात हळुवार करावयास हवी. जी आत्मविश्वासाची; पण हळुवार असेल. आलं का ध्यानात?"

जोनाथन नवजवान समुद्रपक्ष्याच्या समांतर खाली उतरला. "आपण दोघं समांतर शिस्तीत उड्डाण करू आणि वरच्या उसळीकडं लक्ष दे! ती हळुवार आणि सहज उचलत जाणारी झेप असेल."

तीन महिन्यात जोनाथनला आणखी सहा विद्यार्थी मिळाले. ते त्याच्याकडे शिकत आहेत म्हणून त्या सर्वांना बहिष्कृत करण्यात आलं, या अद्‌भुत नवीन कल्पनेबद्दल त्यांचं कुतूहल तसूभरही कमी झालं नाही. उलट आनंदासाठी उडणं हेच त्यांचं ध्येय बनलं होतं. असं का उडायचं? त्या मागचं कारण काय आहे? या उत्तरात त्यांना रस नव्हता. फक्त आपल्या क्षेत्रात उत्तम कामगिरी करायची होती. त्यासाठी निरंतर मेहनत करणे हा एकच मार्ग समोर होता.

"आपण प्रत्येकजण एका गोष्टीचा पाठपुरावा करतोय. महान समुद्रपक्षी बनायचं. अमर्यादित स्वातंत्र्याचा उपयोग घ्यायचा. हे आहे ते अंतिम सत्य." समुद्रकिनारी सायंकाळी ते परतले की जोनाथन सांगायचा,"उडण्यात सहजता हवी. कौशल्य हे पुढचं पाऊल. निर्दोषता ही पारंगतता. आपल्यात उपजत शक्तीचं एक अस्तित्व असतं ते वापरायचं. काही मर्यादांची बंधनं आडवी येतात ती बाजूला सारायची. याचा समुचित लक्षणीय परिणाम हाती येतो आणि त्याचं प्रत्यंतर दिसून येतं. उच्च गतीच्या सरावात, हळुवार उडण्यात आणि विमानासारख्या कसरतीतही."

दिवसभरातील थकव्यानं ते विद्यार्थी लवकर झोपी जात. सराव गतिमान आणि उत्तेजित करणारा असे. तिथं प्रत्येक पाठात नवं शिकण्याची ओढ होती. उत्तम उडणं म्हणजे वारा आणि पंखासोबत फिरण्याचं सोपं तंत्र आहे, यावर प्लेचर लिंड आणि इतरांचा विश्वास नव्हता.

"तुमचं सगळं शरीर अगदी या पंखाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत दुसरं तिसरं काही नाही, तो आहे तुमचा विचार." जोनाथन म्हणाला, "तेच तुम्ही उडताना प्रत्यक्ष बघत असता. विचारांची साखळी

खंडित करा, काय होतं? तुमच्या शरीराची लयही खंडित होते." त्यानं जे काही सांगितले, ते जणू एक कल्पित गोष्ट होती आणि शांत झोप येण्याकरिता आणखी अशांची आवश्यकता होती.

एक महिना उलटताच जोनाथन स्वतःशी पुटपुटला, "आता थव्याकडे परतण्याची वेळ झाली आहे."

"आमची अजून वेळ आलेली नाही." हेन्री कॅलविन गल म्हणाला. "आमच्या या कामामुळे आमचं कोणी स्वागत करत नाही. आम्ही सगळे एकजात बहिष्कृत आहोत. ज्या ठिकणी आम्हाला बघून आनंद होणार नाही, अशा ठिकाणी जाण्याची आम्ही स्वतःवर आता सक्ती करणार नाही. होय की नाही?"

"आपल्याला जिथं जावं वाटतं, तिथं जायला आपण मुक्त आहात; आणि आम्ही असेच आहोत." जोनाथन उत्तरला. वाळूवरून तो उडाला. पूर्वेकडे वळला आणि थव्याच्या घरअंगणाच्या दिशेनं उडू लागला.

त्या विद्यार्थ्यांच्या मनात थोडं दुःख दाटून आलं. असा कसा आहे हा कायदा? बहिष्कृत केलेल्याला आपल्या परिवारात परतता येत नाही. गेल्या दहा हजार वर्षांत या नियमांचे कोणीही उल्लंघन केले नाही. कायदा सांगतो आहे तिथंच थांबा. जोनाथनचं म्हणणं आहे, चालत राहा. आतापर्यंत तो एक मैलभर दूर समुद्रात गेला होता. आम्ही जर इथं अधिक काळ थांबून राहिलो तर त्यांची एकट्याची गाठ विरोधी थव्याशी पडेल.

"आम्ही जर थव्याचे सभासद नसू, तर हा नियम पाळण्याचं आपल्यावर बंधन नाही. होय की नाही?" प्लेचर जाणीवपूर्वक म्हणाला, "जर भांडणतंटा उद्‌भवलाच तर तेथे इथल्यापेक्षा अधिक मदत करणारे असतीलच." आणि

त्या सकाळी ते पश्चिमेकडून उडू लागले. उडताना त्यांचा आकार हिऱ्याच्या दुहेरी माळीसारखा दिसू लागला. ते एकूण आठजण होते. पंख एकदुसऱ्यावर पसरलेले. पक्ष्यांची गावपंचायत भरायची त्या किनाऱ्यावरून ते चालले होते. एकशे पस्तीस मैलांची गती होती. जोनाथन सर्वात पुढं नायकाप्रमाणे उडत होता. उजव्या बाजूला प्लेचर. हेन्री कॅलविन डावीकडे धैर्यानं सोबत होता. सर्व कळप उजवीकडे वळला. एक एका पक्ष्यातील अंतर सारखं होतं. एखादा पक्षी वाऱ्याच्या झोतानं उलटे. पुन्हा समपातळीवर येई. वाऱ्याचा चाबूक सर्वांच्या पंखांवर मोकळ्या हाताने तडाखे देत होता.

पक्ष्यांचा दररोजचा कलकलाट आणि कर्कश आवाज विरून गेला, पूर्ण थांबला आणि उडणाऱ्या पक्ष्यांचा आकार एका राक्षसी चाकूसारखा दिसू लागला. दूरवर खाली आठ हजार समुद्र पक्ष्यांच्या नजरा त्यांच्यावर खिळल्या होत्या. त्यांची पापणीसुद्धा मिटत नव्हती.

एक एक पक्षी झरकन वर उसळी घेत गोलाकार फिरकी घेऊ लागला. खाली उतरण्यापूर्वी गतीला लगाम घालत, धीम्या गतीनं दोन पायांची शिडी जमिनीशी समांतर सोडत, वाळूवर अलगद उतरू लागले. दररोजच ही क्रिया घडत असे. तरी जोनाथनने उड्डाणासंबंधी टिपणी सुरू केली.

"सुरुवात करायची म्हटल्यास", उसने हसू दाखवीत तो म्हणाला, "सर्वांनी एकत्रित उंच झेपावताना थोडा विलंब झाला."

वीज चमकावी तसे शब्द थव्यातून कडाडत गेले आणि पुन्हा थव्यातून शब्द बाहेर आले. "ते जातीबाहेर काढलेले पक्षी आहेत आणि ते परत आले आहेत. पूर्वी असं कधी घडलं नाही."

प्लेचरचा भविष्यासंबंधीचा झगडा थव्याच्या गोंधळात विरून गेला.

"ठीक आहे. ते जातीबाहेर काढलेले असतीलही," काही नवतरुण पक्षी म्हणाले, "पण त्यांना पृथ्वीवर असं उडायला कुठं शिकायला मिळालं असतं?"

प्लेचरचे शब्द ध्यानात यायला, त्याचा अर्थ उमजायला थव्यातील सर्वांसाठी एक तास उलटावा लागला. शेवटी त्यांच्या लक्षात आलं. जो पक्षी बहिष्कृताची बाजू घेऊन बोलत होता, तो स्वतःच बहिष्कृत होता. म्हणजे बहिष्कृतानेच थव्याचा नियम मोडला होता.

त्या क्षणापासून, जोनाथनच्या पंखांवर करड्या रंगाची छटा पसरली; ती त्याच्या लक्षात आली नाही आणि इतरांनाही आढळली नाही. मात्र, त्याने त्यांचा सराव समुद्रपक्षाच्या गावपंचायतीच्या किनारी सुरू ठेवला. प्रथमच तो त्याच्या विद्यार्थ्यांना आपल्या अत्युच्च कार्यक्षमतेइतकं उडण्याचा प्रयत्न करा, असा आग्रह करू लागला.

"मार्टिन गल," तो उडत असतानाच मोठ्यानं म्हणाला, "तू सांगायचा की, तू धीम्या गतीनं उडू शकतोस; पण आतापर्यंतच्या कामगिरीवरून तू दाखवून दिलं आहेस, तुला काहीच उडता येत नाही. चल पुन्हा भरारी घे."

शांतपणे आपला सराव करणाऱ्या मार्टिन विल्यम सीगलने दचकून आपल्या प्रशिक्षकाकडे बघितलं. प्रशिक्षकाच्या रागाचा तो धनी झाला होता. मनाला समजावीत तो एखाद्या कसलेल्या जादूगारासारखा पुन्हा संथगतीने उडू लागला. हवेची एखादी झुळूक आली की पंखांना थोडी मुरड घालत, पंखही न हलविता स्वतःला थोडं वर उचली. मध्येच वाऱ्याचा जोर वाढला की त्यावर स्वार होई. वाळूपासून आकाशातील ढगांपर्यंतचा वरखाली झोकाच सुरू होता.

चार्लस रोलँड तर उत्तुंग विंग पर्वताच्यावर चोवीस हजार फुटांवरून भरारी घेई. थंड निळ्याशार विरळ हवेतून खाली उतरे. हे कसब मती गुंग करणारं आणि अपार आनंदाचं होतं. उद्या आणखी उंच उंच उडायचं, हा त्यातून निर्धारही दिसत होता.

प्लेचरला विमानासारख्या कसरती आवडायच्या. समांतर रेषेतील स्वतःभोवतीच्या गिरक्यांचे सोळा गुण त्याने जिंकले होते. पुढच्या दिवशी, गाडीचं चाक आसाभोवती जसं फिरतं, तशी कसरत केली होती. यावेळी सूर्यकिरणं त्याच्या पंखांवर पडून ते चकाकत होते.

आणि यावेळी एक डोळा त्याच्या कामगिरीकडे चोरून टक लावून समाधानानं बघत होता.

प्रत्येक तासानं जोनाथन आपल्या विद्यार्थ्यांच्या बाजूनं उडत राही. यावेळी बारकाव्याचे प्रात्यक्षिक दाखवी. सूचना करी. प्रोत्साहन देई आणि अधिक चांगलं उडण्यासाठी मार्गदर्शनही करी. रात्रीही तो त्यांच्या सोबतीने उडत राही. वादळ असलं, ढगांचा पडदा मार्गात आला की त्यातून उडणं हा खेळाचा भाग समजून उडायचं. आणि यावेळी समुद्रपक्ष्यांचा थवा दाटीवाटीनं अन् कष्टी मनानं मैदानावर बसलेला असे.



उडणं संपलं की सगळे विद्यार्थी वाळूवर आरामाने बसायचे. जोनाथनचं शिकविणं ते कानात जीव आणून ऐकत राहायचे. त्याच्या जगावेगळ्या कल्पना विद्यार्थ्यांच्या डोक्यावरून जायच्या. काही चांगल्या होत्या, त्या सगळे ऐकत.

रात्र वाढत होती. जोनाथनभोवती विद्यार्थ्यांचं वर्तुळ झालेलं.

थोड्या वेळात त्या विद्यार्थ्यांभोवती आणखी एक वर्तुळ तयार झालं. अंधार छेदून ते नवे जिज्ञासू समुद्रपक्षी तासन् तास जोनाथनचं शिकवणं ऐकू लागले. कोणीही एक दुसऱ्यास पाहत नव्हता. परस्पर ओळख दाखविण्यात त्यांना रस नव्हता. अंधाराचा पडदा दूर होईपर्यंत एका चित्तानं त्याचं बसून ऐकत राहण्याची त्यांची तयारी होती.

थव्याची लक्ष्मणरेषा ओलांडून पहिला समुद्रपक्षी जोनाथनकडं आला आणि म्हणाला, "मला उडवायला शिकवा..." या घटनेला आता एक महिना झाला होता. शिकवा म्हणालेल्या, टेरेन्स लॉविल गलची सर्वांनी निर्भत्सना केली. बहिष्कृताचा शिक्का मारला. हा जोनाथनचा आठवा विद्यार्थी होता.

दुसरी रात्र.

थव्यातून आणखी एकजण वाळू तुडवीत, झोकांड्या खात स्वतः पुढं येऊ लागला. तो होता किर्क मेनार्ड गल. आपले पंख फरफटत शरीराचं ओझं ओढत आला आणि जोनाथनच्या पायाशी कोसळला.

"मला मदत करा!" हळू खोलं आवाजात दयायाचना करत म्हणाला, "या जगात कोणीही उडालं नसेल, असं मला उडायचं आहे."

"चला तर माझ्याबरोबर!" त्याला प्रोत्साहन देत जोनाथन म्हणाला,

"या जमिनीपासून आपण दूर जाऊ आणि निळ्याभोर आकाशात उड्डाण करू. आत्ताच आपण सुरू करू."

"मला काय म्हणायचं आहे हे तुम्हाला कळलेलं दिसत नाही. माझे हे पंख बघा. मी ते हलवू शकत नाही."

"मेनार्ड गल, तुमचं एक स्वातंत्र्य आहे. त्याचा शोध घ्या. आतल्या आत बघा. हा आताचा क्षण आहे, तो फक्त तुमचाच आहे. ती वेळ कारणी लावा. बघा! एकदा तुम्ही स्वतः ठरविलं तर तुमच्या मार्गाआड कोणीही येणार नाही. हा या महान समुद्रपक्ष्यांचा अलिखित कायदाच आहे आणि एकदा आपण कायदा स्वीकारला की..."

"याचा अर्थ असा घेऊ का की, मी उडू शकेन?"

"नक्कीच! मी खात्रीने सांगतो. तू आता मुक्त आहेस..."

मेनार्ड गलने जोनाथनकडे विश्वासाने बघितले. सहजतेने पण झटकन पंख पसरविले. फारसे श्रम न घेता काळोख्या आकाशात झेप घेतली.

"मी उडू शकतो. ऐका हो ऽ ऐका! मी उडू शकतो."

पाचशे फूट उंचीवरच्या आकाशातील मोठ्या आवाजानं झोपलेला पक्ष्यांचा थवा खडबडून जागा झाला.

सकाळ झाली.

वर्तुळाकार विद्यार्थ्यांभोवती आता सुमारे एक हजार पक्ष्यांचा वेढा पडला. मेनार्डकडे सगळे आश्चर्यानं बघत होते. आपल्याला कोणी बघेल अथवा कोणी बघणार नाही याबद्दल आता कोणालाही चिंता उरली नव्हती. एकचित्तानं सगळे ऐकत होते. जोनाथन सीगल जे सांगतोय, ते हृदयापासून समजून घेण्याचा प्रयत्न करत होते.

जोनाथन अगदी सोप्या पद्धतीनं सांगत होता.

उडणं हा प्रत्येक समुद्रपक्ष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. उडणं म्हणजे आपलं स्वातंत्र्य उपभोगणं आणि जगणाराची नैसर्गिक गोष्ट म्हणजे हे स्वातंत्र्य. तुमची आतली ऊर्जा, ज्याला तुम्ही इच्छाशक्ती म्हणता, ती जागती ठेवा. हे केलं तर, तुमच्या मार्गात एखादा पर्वत जरी उभा टाकला तर, त्याला दूर ढकलणं हेच तुमचं कर्म ठरतं. मग तो एखादा धार्मिक विधीचा संस्कार अथवा अंधश्रद्धा असो, कोणतीही मर्यादा त्याआड येत नाही.

"दूर सारा! बाजूला हटवा!" जमलेल्या भोवतालच्या पक्ष्यांच्या थव्यातून प्रतिसादाचे ध्वनी उमटले, "मग तो थव्याचा पारंपरिक कायदा असला तरी हरकत नाही."

"एकच खरा कायदा आहे आणि तोच मुक्तीचा मार्ग दाखवितो आणि अंतिम सत्य म्हणजे हे मनसोक्त उडण्याचं स्वातंत्र्य." जोनाथन म्हणाला, "याहून दुसरं सत्य या जगात असत नाही."

"तुझ्यासारखे आम्ही उडावे अशी अपेक्षा तुम्ही कशी बाळगता?" आणखी एकानं शंका व्यक्त केली, "इतर पक्ष्यांपेक्षा तुझं वेगळं वैशिष्ट्य आहे. तुला ही दैवी शक्तीची देणगी लाभली आहे, असं म्हणता येईल."

"ह्या फ्लेचरकडे बघा! हा लॉवेल, हा चालेस रोलँट पाहा! हेसुद्धा तुमच्या सारखेच आहेत. वेगळे नाहीत. ते उडू शकतात. मग काय त्यांनाही विशेष देणगी मिळाली काय? त्यांच्यात आणि तुमच्यात काय फरक आहे. माझ्या दृष्टीनं एकच फरक आहे. आपल्यात एक शक्ती आहे, हे त्यांनी ओळखलं आहे. आपण कोण आहे, हे त्यांनी जाणून घेतलं आहे. समुद्रपक्ष्यानं उडायचं असतं, हे त्यांनी ओळखलं आणि त्यांच्या सरावाची सुरुवात केली.

सहजपणे त्यांच्या विद्यार्थ्यांनी आकाशात झेप घेतली आणि फ्लेचरला बोल लागला नाही. आपण आता काय करत आहोत, हे त्यांना जाणवलंही नाही.

दररोज अधिकाधिक गर्दी वाढू लागली. प्रश्न विचारणारे वाढले. सगळे जोनाथनला देवासमान मानू लागले, तर काही तिरस्काराने नावेही ठेवू लागले.

एक दिवस सकाळची वेळ होती. जोनाथन आणि फ्लेचर प्रगत गतिमान सरावाहून परतत होते. फ्लेचर म्हणाला, "पक्ष्यांच्या थव्यात कुजबूज सुरू आहे. ते म्हणत आहेत, तुम्ही जर या महान समुद्रपक्ष्याचे पुत्र नसता तर, या काळाच्या पुढं एक हजार वर्षे राहिले असता."

जोनाथनने उसासा टाकला.

गैरसमजाची अशीच किंमत मोजावी लागते, तो स्वतःशी म्हणाला. ते तुम्हाला देव म्हणतील अथवा दानवही म्हणतील.

"फ्लेचर तुझं काय मत आहे? खरंच आपण आपल्या काळाच्या पुढं आहोत काय?"

दीर्घ काळाची शांतता पसरली.

"या प्रकाराचं उडणं, त्याबद्दल शिकणं, हे इथं अनेक दिवसांपासून सुरूच आहे. बरेच जण शिकत आहेत; पण त्यांना अधिक शोध घ्यावा वाटतो, वेगळं काही करावं वाटतं, ते मात्र नक्कीच इतरांपेक्षा पुढं आहेत.

त्यांना या काळाचं काही देणंघेणं नाही. कदाचित आम्ही आमच्या प्रयत्नानं आमच्या पद्धतीच्या पुढं असूत. अनेक समुद्रपक्षी जसे उडतात, त्यांच्यापेक्षा थोडं प्रगत म्हणता येईल."

"हे मात्र वेगळं आहे." थोडा वेळ हळुवार उलटी गिरकी घेत जोनाथन म्हणाला, "काळापेक्षा पुढं असणं हे काही अर्ध वाईट असण्यासारखं नाही."

आठवडाभरानंतर ही घटना घडली.

फ्लेचर आपल्या नव्या विद्यार्थ्यांना शिकवीत होता. प्रात्यक्षिक करून दाखवीत होता. अतीवेगानं उडण्याची मूलतत्त्वे काय आहेत, हे समजावीत होता.

सात हजार फूट उंचीवर त्यांचं उडणं सुरू होतं. मधेच स्वतःला वर उचलीत त्याने मुसंडीसारखा सूर मारला. दूरवर समुद्र किनारी करड्या रंगाची एक रेषा जणू अंगावर गोळीबार करत असल्यासारखी दिसू लागली आणि याच वेळी एक तरुण पक्षी त्याच्या पहिल्या उड्डाणाकरिता हळुवार सूर मारण्याच्या तयारीत अचानक मार्गात आला आणि त्याच्या आईला हाका मारू लागला. या तरुण पक्ष्याचा धडक चुकविण्याकरिता डोळ्याचं पातं लवत नाही तोच फ्लेचर लिंड गलने कष्टपूर्वक डावीकडे गिरकी घेतली. त्या वेळी त्याचा वेग तासाला दोन मैल होता आणि तसाच तो समोरच्या ग्रॅनाईट खडकाच्या उंच कड्यात घुसला. दुसऱ्या जगाचा महाभयंकर कठीण दरवाजा वाटला तो त्याला. प्रचंड भीतीची लाट अंगावर आली. जणू अनोळखी आकाशात त्याचा मार्ग चुकलेला होता तो! सगळं विस्मरणात गेलेलं. तो आठवण्याचा पुन्हा पुन्हा प्रयत्न करतोय. पुन्हा विस्मरणाची घनदाट छाया! खोलवरून दुःखाचा डोंब उसळलाय. केविलवाण्या अवस्थेनं अगदी दया वाटावी, अशी स्थिती झाली.

खोलवरचा आवाज ऐकू येऊ लागला. अगदी पहिल्या दिवशी ऐकला तसा! जोनाथन लिव्हिंगस्टन सीगलची पहली भेट झाली त्या दिवसासारखा!

"फ्लेचर! ती युक्ती कर! आपल्या सर्व मर्यादांवर मात करणारी ती युक्ती! हळूहळू त्याचं स्मरण कर. शांतपणे तू जे काय केलंस ते आठव. मला माहीत आहे, डोंगरकड्यातून उडत जाण्याबद्दलचा आपण अभ्यास केला नव्हता. नंतरच्या अभ्यासक्रमात तो भाग शिकविला जाणार आहे."

"जोनाथन!"

"महान समुद्रपक्ष्यांचा तो एक सुपुत्र म्हणूनही सगळे जण त्यास ओळखतात." त्याचा प्रशिक्षक निरसपणे म्हणाला.

"येथे तू काय करणार आहेस?" त्यानं स्वतःला विचारलं, "या प्रचंड कड्याची संगत आता. मी सांगितलं होतं. शिकवलं आहे. मरणाला शरण जायचं नाही. संघर्ष करायचा."

"होय फ्लेचर! बरोबर विचार करतेस तू. तर मग, कर सुरू! तू आता माझ्याशी बोलतो आहेस. तसेच तू विचारही करतो आहेस, म्हणजे तू नक्की मरणार नाहीस. होय की नाही? आता तू एकच करायचं! देहभानाच्या जाणिवेची पातळी अचानक बदलायची. त्यामुळे मनोधैर्य नकळत वाढत जातंय. आता तुझी संधी तुझ्याच हातात आहे.

"तू या पातळीवर उडत राहून शिकू शकतोस. तू अगोदर जिथं होतास, त्या ठिकाणाहून हे अधिक उंचावर आहे. त्याच बरोबर तुला हवं तर तू परतू शकतोस आणि आपल्या कळपात सामील होऊ शकतोस. जे वयस्कर आहेत, त्यांना आतल्या भीतीनं घेरलंय. काही तरी अनर्थ होणार असं त्यांना वाटतंय. आता त्यांनाही आश्चर्याचा धक्का बसलाय, कारण तू त्यांना उपकृत केलेलं आहेस."



"पक्ष्यांच्या थव्यात जायला मला आवडेल. मी नुकताच एका नव्या गटाबरोबर शिकायला सुरुवात केली आहे."

"ठीक आहे, फ्लेचर! आपण काय बोललो ते आठव. आपलं हे शरीर महत्त्वाचं आहे की विचार महत्त्वाचे आहेत? मला वाटतं विचारच अधिक महत्त्वाचे आहेत."

फ्लेचरनं होकारार्थी डोकं हलविलं. आपले पंख ताणले. डोळे उघडले. तो कड्याच्या पायथ्याशी होता आणि त्याच्या भोवती सगळ्या पक्ष्यांनी गराडा घातला. पक्षी जमा झाले होते. त्यानं ठामपणे पाय उचलला. डोंगराच्या खडकाळ उतरणीवर कर्कश आवाज आणि विरोधदर्शक आरडाओरड सुरू झाली.

"तो जिवंत आहे. तो जवळजवळ मेलाच होता."

"मृत्यूनं त्याला गाठलं होतं; पण तो त्याच्या पंखांच्या टोकांनाच फक्त स्पर्श करून परतला. त्याला जीवदान मिळालं आहे. तो आता महान समुद्रपक्ष्याचा सुपुत्र झाला आहे."

"नाही, नाही! तो ते नाकारत आहे. तो सैतान आहे सैतान! आपला एकसंध थवा कपटानं फोडण्यासाठीच तो परत आला आहे."

चार हजार समुद्रपक्ष्यांची ती गर्दी होती. आरोपांच्या फैरी झडू लागल्या. जे काही घडलं होतं, ते बघून सगळे घाबरले होते.

सैताऽन सैताऽन म्हणून ओरडू लागले.

समुद्रावर जणू प्रचंड वादळ घोंगावत आलं होतं, आणि ते सगळे त्यात सापडले होते.

सर्वांचे डोळे फ्लेचरवर वळलेले. धारदार चोचीचे जणू भाले रोखलेले आणि जे आहे ते नष्ट करायचा त्यांचा इरादा दिसत होता.

"आपण जर येथून निघालो तर तुला बरं वाटेल, फ्लेचर?" जोनाथनने विचारलं.

"आपणं तसं केलं तर माझा फारसा आक्षेप नसेल. आपण असं केलं तर..."

दोघे तात्काळ एक मैल दूर सरकले आणि गर्दीतल्या समुद्रपक्ष्यांच्या चकाकणाऱ्या चोंची मोकळ्या हवेत मिटल्या."

"असं का होतंय?" जोनाथन गोंधळला. "तू मुक्त आहेस, हे एकाही पक्ष्यास पटविणं ही जगातील सर्वात अवघड गोष्ट आहे. त्यांनी स्वतः काही काळ सराव केला तर, त्यांचीही खात्री पटेल आणि त्यांना कळून चुकेल की आपण जो इतरांना विरोध करत आहोत, तो रास्त नाही."

बदललेल्या परिस्थितीकडे फ्लेचर डोळ्यांची हळुवार हालचाल करत बघत होता.

"तू हे कसं केलंस? आपण इथं कसे आलोत?"

"घेरलेल्या जमावातून बाहेर यावं, असं तुला वाटत होतं. होय की नाही?"

"होय. पण मला कळत नाही, तुला हे कसं जमलं?"

"त्यात विशेष काही नाही फ्लेचर! इतर वेळेसारखंच आत्मबळानं बाहेर आलोय. चल, आता आता आपण सराव करू!"

सकाळ झाली. फ्लेचरचा वेडेपणा पक्षी विसरून गेले, पण तो मात्र तो क्षण विसरला नाही.

"जोनाथन, फार पूर्वी तू मला जे सांगितलं होतं, ते आठव! पक्ष्यांवर प्रेम करणं म्हणजे त्यांच्यात परतणं आणि आपल्या आवडीचं काम सतत शिकत राहणं, शिकणं. त्या कामाचाच ध्यास घेणं."

"होय."

"मला अजून उमजलं नाही. ज्या जमावाने तुला मारण्याचा प्रयत्न केला, त्यांच्यावर प्रेम करायचं. त्यांच्याशी जुळवून घ्यायचं. हे कसं जमतं तुला?"

"फ्लेचर, याचा अर्थ तू अजून तुझ्या कामावर मनापासून प्रेम करीत नाहीस. या जगात तुला जे जे वाईट वाटतं, त्याचा तू द्वेष करतो की प्रेम? आजूबाजूला जे चांगलं नाही, त्याबद्दल मनात चांगले विचार येतात की त्याविरुद्ध? यावर सोपं उत्तर आहे. द्वेष असू दे की वाईट गोष्ट असू दे, दोहोंवर सारखंच प्रेम करावं. मनाला सतत बजावलं पाहिजे. चांगलं-वाईट असा भेदाभेद करायचा नाही. याच दृष्टीने प्रत्येक घटनेकडे बघितलं पाहिजे. त्यातून आपल्या आवडीच्या कामाचा सराव करावा. हे खऱ्या समुद्रपक्ष्याचं वैशिष्ट्य आहे. प्रत्येकात जे चांगलं आहे, त्याचा शोध घेणं आणि त्याचं अनुकरणं करणं, ही शिकण्याची उत्तम प्रक्रिया आहे. यालाच मी प्रेम करणं म्हणतो. एकदा का तुम्हाला अशा जगण्याची गुरुकिल्ली सापडली, की मग सुरू होते निखळ आनंदयात्रा!

"मला तो प्रसंग आठवतो. तो रागीट पक्षी, आपण उदाहरणार्थ त्याचं नाव या वेळी प्लेचर लिंड सीगल समजू, सुरुवातीस कसा होता? सगळ्यांनी त्याला नुकतंच जातीबाहेर काढलं होतं. बहिष्कृताचं अपमानास्पद जीवन त्याच्या वाट्याला आलं. त्यामुळं भन्नाट डोक्याच्या या तरुणानं काय केलं? थव्यातील प्रत्येकाशी जीवघेणा झगडा सुरू केला. एवढंच नाही तर, दूरवरच्या उंच उंच दुर्गम कड्यात रागानं उडत राहिला. आपला खडतर यातनामय नरक स्वतःच निर्माण केला; पण त्याच पक्ष्यानं स्वतःतलं आत्मबळ ओळखलं. मनाला मुरड घातली. आज तो याच ठिकाणी स्वकर्तृत्वानं आनंदाचा स्वर्ग स्वतः निर्माण करीत आहे आणि एवढंच नाही तर, आपल्या सगळ्या बांधवांना त्या दिशेनं घेऊन जाण्यासाठी मदत आणि मार्गदर्शनही करत आहे."

फ्लेचरने आपल्या प्रशिक्षकाकडे पाहिलं. त्याच्या डोळ्यांत समाधान आणि आत्मविश्वासाची चमक तरळली.

"मी मार्गदर्शन करीत आहे? तुम्हाला काय म्हणायचं आहे जोनाथन? तुम्ही माझे गुरू आहेस. मला असे मधेच सोडून जाता येणार नाही तुला."

"मी का जाऊ शकत नाही? फ्लेचर तू विचार कर! इथं आणखी पक्षी आहेत. त्यांचे मोठे थवे आहेत. तसेच तुझ्यासारखे फ्लेचरही त्यांच्यात आहेत. त्यांना शिकविण्यासाठी माझ्यासारख्यांची आवश्यकता आहे. हा प्रवास आहे. अखंड चालू राहणारा प्रवास. हृदयातील प्रकाशाने आनंदाचा मार्ग दाखवीत जाणारा!"

"मग माझं काय होणार जोनाथन? मी तर एक साधा समुद्रपक्षी आहे आणि तुम्ही तर..."

"महान समुद्रपक्ष्याचा पुत्र! बस एवढंच ना!" दीर्घ उसासा टाकून जोनाथन दूरच्या समुद्राकडे बघू लागला.

"तुम्हाला फार काळ आता माझी गरज भासणार नाही. तुम्हाला तुमच्या आत्मबळाचा शोध चालू ठेवावा लागेल. दररोज अधिकाधिक प्रयत्न ही खरी साधना असेल. त्यातून कर्माचं सत्य समोर येईल आणि ते तुमचं अमर्याद यश असेल, फ्लेचर तुझ्या आतापर्यंतच्या प्रवासासारखं. जोनाथन काही काळासाठी तुमचा मार्गदर्शक होता. आता तुम्हाला तुमच्या आत्मशोधाचा सराव निरंतर चालू ठेवावा लागेल."

क्षणभर जोनाथनचे शरीर हवेत थरथरले, लुकलुकू लागले आणि हळूहळू हवेसोबत पारदर्शी होत गेले. "माझ्यासंबंधी त्यांच्यात (पक्ष्यांत) मूर्ख अफवा पसरू देऊ नका. तसेच मला देवपणही चिकटवू नका. मी फक्त एक समुद्रपक्षी आहे. मला फक्त उडणं आवडतं. ठीक आहे, फ्लेचर! कदाचित..."

"जोनाथन?"

"वेड्या फ्लेचर! मी जे सांगितलं, त्यावर तुझा विश्वास बसत नाही काय? तुझे डोळे काय सांगत आहेत? ते फक्त मर्यादा दाखवत आहेत. आपल्या जाणिवांकडे मनापासून लक्ष द्या. तुम्हाला जे माहीत आहे, त्याचाच पुढे पुढे शोध घेत राहा. मला खात्री आहे. तुम्हाला हवा आहे तो मार्ग सापडेल. तो मार्ग असेल निरंतर आनंदाचा."

लुकलुकणं थांबलं.

रिकाम्या अवकाशात जोनाथन दिसेनासा झाला.

थोड्या वेळानं फ्लेचरने स्वतःला आकाशात झोकून दिलं आणि नव्या तरुण विद्यार्थ्यांच्या गटाला भिडला. आपला नवा पाठ त्यांना शिकविण्यासाठी तो उतावीळ झाला होता.

"आता आपण सुरू करूयात." मोठ्या आवाजात त्यानं सुरू केलं.

"तुम्ही प्रथम स्वतःला ओळखा. तुम्ही आहात समुद्रपक्षी. समुद्रपक्षी म्हणजे अमर्याद स्वातंत्र्याचं प्रचंड भांडार. ती आहे महान समुद्रपक्ष्यांची उज्ज्वल प्रतिमा.

तुमचं हे शरीर बघा. पंखांच्या या टोकापर्यंत काय आहे? ते दुसरं तिसरं काही नाही, ते आहे फक्त तुमच्या जगण्याचं चिंतन."

नवख्या तरुण पक्ष्यांनी त्याच्याकडे चेष्टेखोरपणे बघितलं.

ते स्वतःशी म्हणाले, "आता या वेळी ऐकून तर घेऊ. उडताना गोलाकार कसा बनवावा, याबद्दल काही नाही या सांगण्यात."

फ्लेचरने एक दीर्घ उसासा टाकला, आणि वरच्या निळ्याभोर कृपाळू आकाशाकडे पाहिलं. "वाऽ छान! फारच उत्तम!!" नव्या पक्ष्याच्या उडण्याकडे समाधानानं पाहत तो उत्साहानं पुढं म्हणाला, "आता आपण समान उंचीच्या उड्डाणापासून सुरुवात करू."

हे सांगत असताना त्याला दिसून आलं, ते सगळे आज्ञाधारक विद्यार्थ्यासारखे शांतपणे ऐकत आहेत. एवढंच नाही तर, फ्लेचरहून अधिक दैवी जिज्ञासेनं शिकत आहेत.

"उडणाऱ्या पंखांना नसते मर्यादा!

जोनाथन, तुम्ही आम्हाला हेच दाखवून दिलं आहे ना!"

त्यानं विचार केला.

"ठीक आहे. आता वेळ फार दूर नाही. या विरळ हवेच्या बाहेर येऊन मी आपल्या समुद्रकिनारी उतरत आहे आणि तुम्हाला उडण्यासंबंधी एक-दोन नव्या गोष्टी दाखविणार आहे. शिकविणार आहे."

फ्लेचर सीगल आपल्या विद्यार्थ्यांना शिकवू लागला. त्याचं शिकविणं कडक शिस्तीचं होतं. शिकविताना त्याला आढळून आलं. ते शिकणारे सगळे मूळतः जोरदार तयारीचे होते आणि एका क्षणात ते त्याला अधिक आवडू लागले.

ते जे आहेत, त्याकडे तो जसजसा बघत गेला, तसतसे ते त्याला आणखी आवडू लागले.

'जोनाथन! आता शिकण्याला आणि आपलं आवडीचं काम करायला, कोणतीही मर्यादा उरली नाही', तो स्वतःशी आनंदानं म्हणाला आणि स्वतःशीच हसू लागला. याच वेळी त्याच्या या नव्या बांधवांनी उत्साहानं शिकायला सुरुवात केली होती.



लेखकाबद्दल-

रिचर्ड बाक हे अमेरिकन हवाई दलाचे माजी पायलट आहेत. गावागावांतून नाटकं करत फिरणारे ते एक हरहुन्नरी कलावंत आहेत. एखाद्या भटक्या जमातीच्या माणसासारखं ते सतत फिरत असतात. तसेच ते एक निष्णात विमान तंत्रज्ञही आहेत.

ते पंधरा पुस्तकांचे लेखक आहेत, हे त्यांचे चवथे पुस्तक. दोन वर्ष ते न्यूयॉर्क टाईम्सचे बेस्टसेलर होते. आणि आजही लाखो लोकांना जगण्यासाठी बळ देत आहे. www.richardbach.com ही त्यांची वेबसाईट आहे.

फोटोग्राफरबद्दल -

अगदी तरूणपणात रशेल मुनसन यांनी विमानाचे छायाचित्रकार म्हणून कोलोराडोतील देवनर इथे सुरूवात केली. छायाचित्रण आणि हवाई सफर करणे हे त्यांचे आवडतीचे छंद. स्कायवर्डः व्हाय फ्लायर्स फ्लाय? हे पुस्तक त्यांनी लिहीले आहे. यात त्यांचीच छायाचित्रंही आहेत. फ्लाईंग रूट ६६ ह्या डिव्हीडीचे लेखन निर्मिती त्यांनी केली आहे. त्यांच्या पाईपर सुपर कब साठी ते छायाचित्रण करत असतात. www.russellmunson.com ही त्यांची वेबसाईट आहे.

अनुवादक -

मराठीतले नामवंत लेखक आणि साकेत प्रकाशन संस्थेचे संचालक. त्यांनी आठ कादंबऱ्या, एक कथासंग्रह, पाच प्रवासवर्णने, दोन आरोग्याची पुस्तके, शरीर-मनासंबंधी दोन पुस्तके, तीन अनुवाद, तीन संपादन, सोळा किशोर कादंबऱ्या, अठरा बालकथा संग्रह, सत्तावीस नवसाक्षरांसाठी लिहिल्या आहेत.

गेली पन्नास वर्ष प्रवास आणि फोटोग्राफीचा छंद.

ई- मेल baba.bhand@gmail.com.